दैनिक
# अधिकारनामा
विदर्भातील सर्वाधिक पसंतीचे दैनिक

Email : adhikarnama2021@gmail.com    Web : www.adhikarnama.in

मुख्य संपादक : निलेश बा. किरतकार मो. ९६६५३८२७८०, ९७६६३८२७८०    कार्यालय : दै. अधिकारनामा, विवरा जि. अकोला – ४४४५११

अकोला * रविवार दि. ०४ सप्टेंबर २०२२ * वर्ष २ रे * अंक १२ * किंमत २ रुपये * RNI Title Code No. : MAHMAR50842

## "शिल्लक राहिलेली काँग्रेस आम्ही वाटून घेऊ"

### एकनाथ शिंदेंसमोर नारायण राणेंचे सूचक विधान



**दै. अधिकारनामा**

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याचे नवे सरकार स्थापन झाल्यापासून महाविकास आघाडीतील नेते नव्या शिंदे-फडणवीस सरकारवर सातत्याने निशाणा साधताना पाहायला मिळत आहेत. याला शिंदे गट आणि भाजपकडून प्रत्युत्तरही दिले जात आहे. यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रीयमंत्री आणि भाजप नेते नारायण राणे यांच्या निवासस्थानी जावून गणपती बाप्पाचे दर्शन घेतले. यावेळी नारायण राणे आणि एकनाथ शिंदे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. काँग्रेसमधील एका मोठ्या नेत्यासह पक्षातील आमदारांचा एक गट सरकारमधील भाजपत जाणार असल्याच्या चर्चेने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या मुद्द्यावर बोलताना नारायण राणे यांनी मोठे विधान केले आहे. काँग्रेस छोडो मोहीम भाजपकडून सुरू आहे का? या प्रश्नावर बोलताना राणे म्हणाले, भाजप थेट कृती करते. त्याचबरोबर शिल्लक राहिलेली काँग्रेस वाटून घेऊ, असे नारायण राणे म्हणाले. तसेच एकनाथ शिंदे यांनी घेतलेला एक निणर्य मला आवडला. मागील अडीच वर्ष असलेले सरकार घरी पाठवण्याचा निणर्य त्यांनी घेतला, तो मला खूपच आवडला. त्यामुळे मी त्यांना अभिनंदन करण्यासाठी बोलावले होते, अशी खोचक प्रतिक्रिया नारायण राणे यांनी दिली. ही सदिच्छा भेट होती. जुन्या आठवणी निघाल्या.

मुख्यमंत्री पदाच्या कारकीर्दीतील अनुभवांबद्दल चर्चा झाली, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. काँग्रेसमधील एक गट सरकारमध्ये सामील होणार असल्याची चर्चा सुरू झाल्यासंदर्भात, काँग्रेसबद्दल बोलत नाही. सभागृहात बोललो आहे. त्यांची जी काय फरफट सुरूये, ती आपण पाहतोय. कुणावर टीका करण्याचा माझा स्वभाव नाहीये, असे एकनाथ शिंदे म्हणाले. आम्ही जनतेच्या मनातील भावना जागृत केली. जे अडीच वर्षांपूर्वी व्हायला हवे होते. लोकांच्या मनात जे होते, तो निणर्य आम्ही घेतला. बाळासाहेबांची भूमिका आम्ही पुढे घेऊन जातोय. काँग्रेसचे नेते सरकारमध्ये येणार असल्याचे मला माहिती नाही, असे एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, याच मुद्द्यावर बोलताना नारायण राणे म्हणाले की, काँग्रेसमधून काँग्रेसवाले म्हणून येत नाहीयेत. ते त्यांच्या शिवसेनेत येत आहेत. ते शिवसैनिक होणार. ते उलट चांगले काम करत आहेत. एक तर ते शिंदे गटाच्या शिवसेनेत जातील नाहीतर भाजपत येतील. जी काँग्रेस शिल्लक राहिलेली आहे, ती आम्ही वाटून घेऊ, असे सूचक विधान नारायण राणे यांनी केले.

## शेवटच्या कॉलने आरोपी अडकले जाळ्यात,


### बापलेकाला चार दिवसांची कोठडी



**दै. अधिकारनामा**

**मलकापूर :** मृतक वृद्ध महिलेच्या फोनवर शेवटचा कॉल आरोपी मुलगा भार्गव याने केला. त्याआधारेच पोलिसांनी तपास करत आरोपी बापलेकाच्या मुसक्या आवळल्या. कौटुंबिक कलहातील रागामुळे बापलेकाने नगरपरिषदेमधील सेवानिवृत्त कर्मचारी प्रभा माधव फाळके यांची हत्या केल्याप्रकरणी मुक्ताईनगर येथील न्यायालयाने आरोपी बाप-लेकाला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे, अशी माहिती मुक्ताईनगरचे ठाणेदार शंकर शेळके यांनी दिली. मृतक प्रभा माधव फाळके (वय ६३, रा. गणपती नगर, भाग २) ह्या २७ ऑगस्ट रोजी परिसरातच असलेल्या मंदिरामध्ये पूजेची थैली घेऊन दर्शनासाठी जात असल्याचे मुलाला व सुनेला सांगून निघून गेल्या होत्या. त्या परतल्याच नाहीत. मुक्ताईनगर पोलिसांना २९ ऑगस्ट रोजी त्यांचा मृतदेह आढळून आला. आढळलेल्या मृतदेहाबाबत तपास करण्यासाठी मुक्ताईनगर ठाण्याचे पथक मलकापुरात दाखल झाले. मृतक महिलेच्या जवळच्या असलेल्यांनीच त्यांचा खून केल्याचा संशय पोलिसांना होता. महिलेच्या मोबाईलचे शेवटचे लोकेशन घरापासून जवळचे अंतर दाखवत होते. त्यानंतर मोबाईल बंद पडला होता. त्यामुळे मुक्ताईनगरचे पोलिस निरिक्षक शंकर शेळके यांनी महिलेच्या घराभोवतीच तपास केंद्रीत केला. तसेच त्या महिलेच्या मोबाईलवर शेवटचा कॉल आरोपी भार्गव गाढे यानेच केल्याची नोंदही पोलिसांना मिळाली होती. ही सर्व वस्तुस्थिती पाहता पोलिस पथकाने त्या महिलेच्या घराशेजारी वास्तव्यास असलेल्या भार्गव विश्वास गाढे (२१), विश्वास भास्कर गाढे (४५) या दोघा बापलेकांना ताब्यात घेत अटक केली. त्यांना शुक्रवारी मुक्ताईनगर येथील प्रथमश्रेणी न्यायालयासमोर हजर केले. त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी दिल्याचे शेळके यांनी सांगितले. मृतक महिला सतत आरोपी गाढे यांच्या घरीच असायची. त्यामुळे त्यांच्या कुटुंबात वाद होत असल्याची माहिती आरोपीने पोलिसांना दिली. ही बाब शेजारी असलेल्यांनाही माहिती असल्याचे पोलिसांनी सांगितले. खूनाचे मूळ कारण अद्यापही पुढे आले नाही. पोलिस कोठडीतून ते पुढे येण्याची शक्यता आहे.

## फरार शिक्षकाच्या सुटी अर्जावरून शाळेत गोंधळ!



**दै. अधिकारनामा**

**खामगाव :** प्रेमकविता लिहून शिक्षिकेच्या नावाने व्हायरल प्रकरणी विनयभंगाचा गुन्हा दाखल असलेल्या शिक्षकांच्या पत्नी आणि भावाने शुक्रवारी दुपारी पळशी बु. येथील जिल्हा परिषद शाळेत एकच गोंधळ घातला. फरार शिक्षकाची सुटी तात्काळ मंजूर करण्यासाठी दबाव आणत सुटी अर्जाच्या सत्यप्रतीवर स्वाक्षरी आणि शिक्का देण्यासाठी धमकी दिली. याप्रकरणी मुख्याध्यापकाच्या तक्रारीवरून संबंधित शिक्षकाच्या पत्नीसह भावाविरोधात ग्रामीण पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. शाळेतील सहकारी शिक्षिकेच्या नावे प्रेमकविता लिहून शैक्षणिक ग्रुपवर व्हायरल केली. तसेच शिक्षिकेशी जवळीक साधण्याच्या उद्देशाने तिच्याकडे टकटक पाहत शिक्षिकेचा विनयभंग केला. याप्रकरणी संबंधित शिक्षिकेच्या तक्रारीवरून रोहिदास रामदास राठोड (५२) या शिक्षकाविरोधात ग्रामीण पोलीसांनी गुन्हा दाखल केला. दरम्यान, या शिक्षकाची सुटी तात्काळ मंजूर करा तसेच सुटी अर्जाच्या सत्यप्रतीवर स्वाक्षरी आणि शिक्यासाठी दबाव आणाला. तसेच मुख्याध्यापकाच्या टेबलावरील शिक्का घेऊन स्वतःच्या हाताने सत्यप्रतीवर मारला. त्यानंतर शिक्का फेकून देत मुख्याध्यापकांना धमकी दिली. अशी तक्रार पळशी बु. येथील मुख्याध्यापक कैलास प्रभु राठोड (५४ रा. पळशी बु.) यांच्या तक्रारीवरून दिपाली रोहिदास राठोड रा. खामगाव, शिवदास रामदास राठोड रा. बुलढाणा यांच्या विरोधात खामगाव ग्रामीण पोलिसांनी भादंवि कलम १८६, १८९ तसेच क्रिमीनल लॉ अमेंटमेंट ॲक्ट १९३२ च्या कलम ७ अन्वये गुन्हा दाखल केला.

## दहावीत ३० तर बारावीत ३२ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण



**दै. अधिकारनामा**

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. बारावीच्या परीक्षेत ३२.२७ टक्के, तर दहावीच्या परीक्षेत ३०.४७ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा टक्का वाढला आहे. बारावीत जे विद्यार्थी नापास झाले त्यांच्यासाठी राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत ही परीक्षा झाली. बारावीच्या पुरवणी परीक्षेसाठी ५४ हजार ५८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. ५३ हजार ५४७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. १७ हजार २८१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. निकालाची टक्केवारी ३२.२७ टक्के इतकी होती. गेल्या वर्षीच्या पुरवणी परीक्षेच्या तुलनेत यंदाचा निकाल ६.४ टक्क्यांनी वाढला आहे. दहावीसाठी २० हजार ५१७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. प्रत्यक्ष परीक्षा दिलेल्या १९ हजार ४२ विद्यार्थ्यांपैकी ५ हजार ८०३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले, तर ७ हजार ६४३ विद्यार्थी एटीकेटी सवलतीसह अकरावीच्या प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत.

## अपूर्ण रस्ता बांधकामाने बालकास इजा

• नंदीपेठ वासी संतापले • पालिकेवर केला हल्लाबोल, • उपविभागीय अधिकाऱ्यांनी बोलाविली बैठक

**कु.चंचल पितांबरवाले**

**अकोट :** शहरातील सोनू चौकातून थेट नंदी पेठ ते दर्यापूर मार्गाला जोडणाऱ्या रस्त्याचे बांधकाम अर्धवट स्थितीत असून त्याद्वारे निर्माण झालेल्या डबक्यात पडलेल्या आठ वर्षीय बालकाचे पायास दुखापत झाल्याने नंदीपेठवासियांमध्ये संताप उफाळून आला. संतापलेल्या शेकडो युवकांनी पालिकेवर हल्लाबोल करून पीडित बालकास चक्क मुख्याधिकाऱ्यांचे मेजावर ठेवून कामाबाबत त्यांना जाब विचारला. नागरिकांचे होणारे हाल आणि परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता आकोट उपविभागीय अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी या कामासंबंधीत विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक सोमवार दिनांक ५ सप्टेंबर रोजी आयोजित केली आहे. नगरोत्थान निधी अंतर्गत आकोट शहरातील अनेक रस्त्यांची कामे सुरू आहेत. त्यात सोनू चौक ते थेट नंदीपेठ येथून दर्यापूर मार्गाला जोडणारा शहरातील अति महत्त्वाचा रस्ता सुरू आहे. परंतु अतिशय दाट लोकवस्तीतून जात असलेल्या ह्या रस्त्याचे निर्माणात अनेक बाधा निर्माण होत आहेत. त्यात प्रामुख्याने लोकांनी केलेले अतिक्रमण, विद्युत पथदिवे यांचा समावेश आहे. वास्तविक हे काम पालिकेकडेच द्यायला हवे होते. मात्र काही कारणास्तव राजकीय इच्छाशक्तीने हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सोपविण्यात आले. तरीही नियमानुसार बांधकामासाठी हा रस्ता मोकळा करणे, हा पालिकेचा जिम्मा आहे. त्या अनुषंगाने पालिकेने भूमी अभिलेख विभागाकडे शासकीय भरणा भरून या रस्त्याची मोजणी केली आहे. मात्र त्या विभागाकडून योग्य त्या खुणा करून देण्यात न आल्याने रस्ता बांधकामात अडचणी निर्माण होत आहेत. परिणामी रस्त्याचे खोदकाम झाल्याने नागरिकांना अतिशय अडचणीचा सामना करावा लागत आहे.

नंदी पेठ परिसरातील हजारो महिला, पुरुष, वृद्ध, शालेय विद्यार्थी, शेतकरी या साऱ्यांना अवागमना करिता हाच एकमेव रस्ता आहे. तोच अतिशय खडतर झाल्याने नागरिक अतिशय हैराण परेशान झाले आहेत. रोज होणारे किरकोळ अपघात, नागरिकांना चालताना करावी लागणारी कसरत याने नागरिक अतिशय त्रस्त झाले आहेत. अशातच दिनांक २ सप्टेंबर रोजी स्वराज राजू उपासे हा आठ वर्षीय बालक शाळेत जाताना या रस्त्याच्या खोदकामामुळे झालेल्या डबक्यात पडला. नूकताच पाऊस झाल्याने या डबक्यात पाणी साचले होते. अचानक तोल जाऊन पडल्याने या बालकाच्या पायाला फ्रॅक्चर झाले. त्याचे पायात रॉड टाकावा लागला. ह्या घटनेने नंदीपेठ वासियांचा राग अनावर झाला. या स्थितीत तेथील युवकांनी पुढाकार घेऊन दुखापत झालेल्या बालकाला रुग्णवाहिकेतून पालिकेत आणले. आणि या बालकाला स्ट्रेचर सहित पालिका मुख्याधिकाऱ्यांच्या मेजावर ठेवले. त्यानंतर बराच वेळ या संतप्त युवकांनी मुख्याधिकारी यांचे कक्षात ठिय्या मांडला. या घटनेची माहिती मिळताच ठाणेदार प्रकाश अहिरे यांनी ताबडतोब आपले पथक घटनास्थळी पाठविले. पोलीस उपनिरीक्षक राजेश जवरे. अख्तर शेख. रंजीत खेडकर. पोहेकॉ उमेश सोळंके,सागर मोरे, विजय चव्हाण, मनीष कुलट यांनी मोर्चेकऱ्यांशी संवाद साधून परिस्थिती नियंत्रणात आणली.



त्यानंतर घटनेची माहिती उपविभागीय अधिकारी श्रीकांत देशपांडे यांना दिली. मात्र ते दौऱ्यावर असल्याने घटनास्थळी हजर राहू शकले नाहीत. तरिही घटनेचे गांभीर्य पाहून त्यांनी ताबडतोब दाखल घेतली. त्यांनी या कामाशी संबंधित सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक सोमवार दिनांक ५ सप्टेंबर रोजी बोलाविली आहे. येथे उल्लेखनीय आहे की, अनेक लोकांनी या घटनेची माहिती देण्याकरता आकोट पोलीस स्टेशनच्या क्रमांकावर संपर्क साधण्याचा प्रयास केला. परंतु पोलीस ठाण्यातून त्यावर कोणताही प्रतिसाद दिला गेला नाही. याबाबत अनेकांनी नाराजी प्रकट केली असून ठाणेदार प्रकाश अहिरे यांनी याकडे आवर्जून लक्ष द्यावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

## मुडगांव प्राथमिक आरोग्य केंद्रात जि.प. सभापती पंजाबराव वडाळ यांची भेट

**कु.चंचल पितांबरवाले**

**अकोट :** तालुक्यातील सर्वात मोठे आरोग्य केंद्र म्हणून ओळखले जाणारे केंद्र म्हणजे मुडगांव प्राथमिक आरोग्य केंद्र होय या आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारीच मुख्यालयात हजर राहत नाहीत तर कर्मचारी कसे हजर राहतील असा प्रश्न उपस्थित होते आज अचानक सकाळी ११वाजताचे दरम्यान जिल्हा परिषद चे सभापती पंजाबराव वडाळ यांनी अचानक भेट दिली असता अनेक कर्मचाऱ्यांनी दांड्या मारल्या असल्याचे सभापती पंजाबराव वडाळ यांच्या लक्षात आले. तेव्हा अशा दांड्या देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वर सभापती पंजाबराव वडाळ कोणती कारवाई करतात या कडे तालुक्यातील जनतेने लक्ष लागले आहे.या आरोग्य केंद्राच्या बाबतीत अनेक वेळा वृत्तपत्रात बातम्या प्रसिद्ध झाल्या परंतु वैद्यकीय अधिकारी व तालुका अधिकारी यांचे संगणमत असल्याने या आरोग्य केंद्राला वरीष्ठानी वाऱ्यावर सोडले आहे व याला साथ जिल्हा आरोग्य अधिकारी देत असल्याने असे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत तेव्हा या प्रकाराला आळा घालण्यासाठी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा व आरोग्य सभापती तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या आरोग्य केंद्रा कडे लक्ष वेधून कारवाई ची मागणी सामान्य नागरिकांनी केली आहे.तसेच या आरोग्य केंद्राला जिल्हा परिषदेच्या आरोग्य अधिकारी यांनी अघाप पर्यंत साधी भेट सुद्धा दिली नाही.जिल्हा आरोग्य अधिकारी उंटावरून शेळया हाकलण्याचे काम करत असल्याचे सुजाण नागरिकाचे म्हणणे आहे.तसेच मध्यंतरी अकोट पंचायत समिती चे गटविकास अधिकारी शिंदे यांनी या प्राथमिक आरोग्य केंद्रात रात्री ९ वाजता चे सुमारास अचानक भेट दिली होती परंतु वैद्यकीय अधिकारी व बरेच कर्मचारी मुख्यालयात राहत नसल्याने गटविकास अधिकारी शिंदे यांच्या लक्षात आले परंतु नंतर या प्रकरणी गटविकास अधिकारी शिंदे यांनी कोणत्याही प्रकारची कारवाई केली नसल्यामुळे पुन्हा आज दिनांक ३सप्टेंबर रोजी तशीच परिस्थिती आज सकाळी सभापती पंजाबराव वडाळ यांना पाहण्यास मिळाली तेव्हा आता या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वर कोणती कारवाई करण्यात येणार या कडे तालुक्यातील जनतेने लक्ष लागले आहे.त्याच प्रमाणे या आरोग्य केंद्रातील कनिष्ठ लिपिक गांवडे हा तर आठवड्यातुन एकदाच आरोग्य केंद्राच्या कार्यालयात उपस्थित असतो इतर दिवशी हे महाशय सापडतच नाही तेव्हा वरीष्ठानी या आरोग्य केंद्राकडे लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

• आज सकाळी 11वाजता मुडगांव प्राथमिक आरोग्य केंद्रात अचानक भेट दिली असता मला अनेक अधिकारी व कर्मचारी मुख्यालयात हजर राहत नाहीत व त्यानी दांड्या मारल्या व कोणत्याही प्रकारचे सुट्टीचे अर्ज नव्हते तेव्हा अशा दांड्या मारणाऱ्यावर कारवाई करण्यात येईल. **- पंजाबराव वडाळ सभापती जिल्हा परिषद अकोला**

• नेहमीच वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी मुख्यालयात उपस्थित नसतात तसेच दांड्या सुद्धा नेहमी मारतात व गटविकास अधिकाऱ्यांनी भेट दिली तेव्हा पासून मोठ्या प्रमाणात दांड्या मारण्याचे प्रमाण वाढले आहे.तसेच अनेक वेळा सुट्टी न टाकता अधिकारी व कर्मचारी प्राथमिक आरोग्य केंद्रातुन गायब असतात. **- अजिज अहमद, सामाजिक कार्यकर्ता मुंडगाव**



संपादकीय

# अग्रलेख : 'नेमेचि' अहवाल..

'एनसीआरबी'चा अहवाल कितीही तुटपुंजा मानला तरी आत्महत्या, महिलांवरील अत्याचार यांविषयीची आकडेवारी डोळे उघडावेत अशीच आहे.. शंभर अपराधी सुटले तरी चालतील, पण एका निरपराध्याला शिक्षा होता कामा नये, हे न्यायाचे तत्त्व आहे. तर मुळात शंभर अपराधी निर्माणच होता कामा नयेत, हे कोणत्याही सुसंस्कृत समाजाचे तत्त्व असते. पण तसे होत नाही. माणसे असतात, त्यांना भावभावना असतात, अहंकार असतात, लोभ असतात, गंड असतात.. त्या सगळय़ासह ती जगतात तेव्हा एकाचा आनंद हे दुसऱ्याचे दुःख, दुसऱ्याची वेदना ठरते. गुन्ह्यंची निर्मिती त्यातूनच होते. ते थांबवता येत नसतील तर निदान त्यांचे प्रमाण कमी होईल हे पाहणे आवश्यक ठरते. त्यासाठी गुन्ह्यंच्या नोंदींचा दस्तावेज तयार करणे, तुलनात्मक अभ्यास करणे हे नित्याचे काम असायला हवे. 'एनसीआरबी' म्हणजेच नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्यूरो अर्थात राष्ट्रीय गुन्हे नोंद विभाग ही सरकारी यंत्रणा १९८६ पासून हेच काम करते आणि दरवर्षी देशभरातील गुन्हे, त्यांचे प्रमाण यांच्याविषयीचा आपला अहवाल प्रसिद्ध करते. या वर्षीही एनसीआरबीचा २०२१ या वर्षांतील सर्व प्रकारच्या गुन्ह्यंसंदर्भातील आकडेवारीचा अहवाल प्रसिद्ध झाला असून हे 'पांढ्ऱ्यावरचे काळे' चिंतेत नेहमीपेक्षाही भर घालणारे आहे. तसे का हे पाहण्याआधी 'एनसीआरबी'विषयी थोडेसे समजून घेणे अगत्याचे. देशभरातील गुन्हेविषयक परिस्थितीचा नियमित विदा (डेटा) तयार होत राहावा या हेतूने १९८६ मध्ये स्थापन करण्यात आलेली ही सरकारी आस्थापना केंद्रीय गृह खात्याच्या अखत्यारीत येते. देशभरातून वेगवेगळय़ा गुन्ह्यंविषयीची वर्षभरातील माहिती पोलीस ठाणी, जिल्हा पातळीवरील यंत्रणा, राज्य पातळीवरील यंत्रणा असा प्रवास करत एनसीआरबीपर्यंत पोहोचते. तिथे या माहितीचे पृथःकरण होऊन आदल्या वर्षभराचा अहवाल तयार होतो. गुन्हेविषयक वेगवेगळया मुद्दयांवरचे स्थितीदर्शक कल सांगणारा हा अहवाल त्या त्या क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी महत्त्वाचा दस्तावेज ठरतो. तो परिस्थिती समजून घेण्यासाठी हातभार लावतोच शिवाय पुढची दिशा ठरण्यासही मदत करतो. अर्थात या सगळय़ा प्रक्रियेतही अनेक त्रुटी आहेत. उदाहरणार्थ या सगळया अहवालांचा पाया आहे तो पोलीस ठाण्यांत नोंद होणाऱ्या गुन्ह्यंमध्ये. या गुन्ह्यंची नोंद कशी होते याविषयी वेगळे काही सांगायची गरज नाही. एखादी व्यक्ती गुन्हा नोंदवण्यासाठी पोलीस ठाण्यात जाते तेव्हा तिला जो अनुभव येतो, त्यातूनच पोलिसी खाक्याबद्दलच्या आख्यायिका गडद होत गेल्या आहेत. गुन्हा नोंदवला गेलाच तर तपास कसा होतो, त्याचे प्रात्यक्षिक प्रत्यक्ष खटल्यातून 'पुराव्याअभावी' गुन्हेगार कसा सुटतो यातून बघायला मिळते. त्यामुळे या यंत्रणेपर्यंत पोहोचून गुन्हा नोंदवणे आणि सगळय़ा प्रक्रिया पार करत न्याय मिळवणे हे सामान्य माणसासाठी जिकिरीचेच होऊन बसते. हे यासाठी सांगायचे की अशा समाजात नोंदवल्या गेलेल्या गुन्ह्यंपेक्षा नोंदवल्या न गेलेल्या गुन्ह्यंची संख्या कधीही जास्त असते. पण तरीही पोलीस ठाण्यापर्यंत जाऊन गुन्हा नोंदवणे ही बाब स्त्रिया, लहान मुले, वृद्ध, दलित, शोषित, वंचित या वर्गासाठी नेहमीच दुष्कर असते. त्यामुळे गुन्ह्यंमध्ये वाढ आणि गुन्ह्यंच्या नोंदणीमध्ये वाढ या दोन्ही गोष्टी वेगवेगळय़ा ठरतात. इतर, अगदी 'बिमारू' राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील गुन्ह्यंचे प्रमाण जास्त दिसते; कारण महाराष्ट्रासारख्या राज्यात असलेली जागरूकता, साक्षरतेचे प्रमाण या गोष्टी राज्याला 'गुन्ह्यंच्या नोंदीचे प्रमाण अधिक असलेले राज्य' ठरवतात. पण ते एका अर्थाने भूषणावह आहे. दुसरी गोष्ट म्हणजे एनसीआरबीच्या अहवालात लोकसंख्येशी गुन्ह्यंचे प्रमाण दाखवणारी टक्केवारी २०११ ची जनगणना गृहीत धरून काढलेली आहे आणि आता २०२२ सुरू आहे. त्यामुळे तिच्या अचूकतेविषयी काही प्रमाणात प्रश्न उपस्थित होतात.

आता एनसीआरबीच्या २०२१ या वर्षांसाठीच्या गुन्हेविषयक अहवालाविषयी. या अहवालातून स्त्रियांची- लहान मुलांची स्थिती, लैंगिक गुन्हे, आत्महत्या अशा वेगवेगळय़ा मुद्दय़ांविषयीचा विदा समोर आला आहे. २०२० मध्ये आलेली करोनाची महासाथ आणि तिच्यामुळे जगाचा बिघडलेला तोल या पार्श्वभूमीवर या अहवालाकडे बघायला हवे. सगळय़ात पहिली गोष्ट म्हणजे २०२० च्या तुलनेत २०२१ मध्ये गुन्ह्यंच्या (नोंदणीच्या) प्रमाणात ७.६ टक्के घट झाली असे हा अहवाल सांगतो. म्हणजे २०२० मध्ये एक लाख लोकसंख्येमागे ४८९.८ गुन्हे नोंदवले जात, ते २०२१ मध्ये ४४५.९ झाले, असे या अहवालाचे म्हणणे. तरीदेखील या अहवालातील सगळय़ात जास्त अस्वस्थ करणारी आकडेवारी आहे ती आत्महत्या करणाऱ्यांसंदर्भातील. २०२१ या वर्षांत एक लाख ६४ हजार ३३ जणांनी आत्महत्या केल्या आणि धक्कादायक गोष्ट म्हणजे त्यात जवळपास ४२ हजार म्हणजे २५ टक्के प्रमाण हे रोजंदारीवर जगणाऱ्या लोकांचे आहे. त्याखालोखाल स्वयंरोजगार करणारे आणि त्याखालोखाल आत्महत्या बेरोजगारांच्या आहेत. आत्महत्या करणाऱ्या स्त्रियांची संख्या ४५ हजारांच्या आसपास आहे. आत्महत्या करणाऱ्या देशभरातील शेतकऱ्यांमध्ये महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे दहा हजार ८८१ (६.६ टक्के) आहे. आत्महत्या करणाऱ्या या सगळया लोकांमध्ये ६४.२ टक्के लोकांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षाही कमी असल्याचे आढळले आहे. शहरांमधली घरे कोटी कोटी उड्डाणे करत असताना, सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आठवा वेतन आयोग लागू होणार की नाही याचीच चर्चा असताना, शहरांमधले मॉल्स दुथडी भरून वाहत असताना आणि आजही आयटी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या पॅकेजेसच्या चर्चा रंगत असताना रोजंदारीवर जगणाऱ्या लाखभर स्त्री-पुरुषांना या जगात जगणेच अस होते, ते महिन्याला साडेआठ हजार रुपयेदेखील कमवू शकत नाहीत, हे वास्तव भीषण आहे. आधी नोटबंदी आणि नंतर करोना या दोन राक्षसांनी हे असे जीव घेतले हे यापुढच्या पिढय़ांनी कधीही विसरता कामा नये. गुन्ह्यंच्या संदर्भात चर्चा करताना स्त्रिया हा घटक नेहमीच महत्त्वाचा असतो. कारण त्यांची सुरक्षितता ही त्या समाजाची इयत्ता दाखवत असते. त्याबाबतीत आपली इयत्ता अजूनही प्राथमिक पातळीवरचीच आहे हे सांगायला खरे तर कोणत्याही अहवालाची गरज नाही. रोज माध्यमांमधून येणाऱ्या बातम्या ती सांगत असतातच. पण हा अहवाल ती अधोरेखित करतो. त्यानुसार २०२० च्या तुलनेत २०२१ मध्ये स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रमाण १५.३ टक्क्यांनी वाढले आहे. ५६ हजार ८३ प्रकरणांसह उत्तर प्रदेश स्त्रियांसाठी सगळय़ात असुरक्षित राज्य ठरले आहे तर राजस्थान आणि महाराष्ट्र त्या खालोखाल आहेत. वर्षभरात देशभरात ३१ हजार ६७७ बलात्काराचे गुन्हे नोंदवले गेले आहेत. त्यात दिल्ली एक हजार २२६ प्रकरणांसह पहिल्या स्थानावर तर कोलकाता ११ प्रकरणांसह सगळयात तळाच्या स्थानावर आहे. लहान मुलांविरोधात होणाऱ्या गुन्ह्यंमध्ये १४.२ टक्के वाढ झाल्याचे हा अहवाल सांगतो. जातीय दंग्यांची, ताणतणावाची प्रकरणे समाजातील अंतर्गत स्वास्थ्याचे वर्तमान सांगतात. त्यात गेल्या वर्षभरात उत्तर प्रदेशात म्हणे 'जातीय तणावाचे फक्त एक प्रकरण नोंदवले गेले', तर झारखंडमध्ये १००, महाराष्ट्रात ७७, राजस्थानात २२ प्रकरणे नोंदवली गेली. उत्तर प्रदेश हे जातीय ताणतणावाच्या बाबतीत देशातले सगळयात शांत राज्य आहे, हे 'वास्तव' पचवणे कदाचित अनेकांना शक्य होणार नाही, पण आकडेवारी तरी तेच सांगते. वृद्धांविरोधातील गुन्हे, मानवी तस्करी, सायबर गुन्हे, आर्थिक गुन्हे अशा गुन्ह्यंच्या वेगवेगळय़ा क्षेत्रांसंदर्भातील आकडेवारी अहवालात मांडली आहे. किती प्रकरणे गुन्हेगारांना शासन होण्याच्या टप्प्यापर्यंत पोहोचली याचीही माहिती त्यात मिळते.

# कंपन्यांच्या चलाखीला वेसण घालणारे स्वदेशी पाऊल




१९९१ साली भारताने आपल्या अर्थव्यवस्थेची बंद दारे खुली करून मुक्त व्यापाराच्या मार्गावर चालण्यास सुरुवात केली. त्यामागे तात्कालिक परिस्थिती, जसे की, डॉलरची उपलब्धता व त्या बदल्यात सोने तारण ठेवण्यासाठी सोन्याची उपलब्धता, देशातील व्यापारातील तूट व किमती ही होती. असे असले त्यासाठी तरी जागतिक बाजारातून व जागतिक बँकेसारख्या त्याच्या समर्थक संस्थांकडून सुधारणा करण्यासाठी येत असलेला दबाव काही प्रमाणात कारणीभूत ठरला होता. भारतात तोपर्यंत व आताही मोठ्या प्रमाणात विविध बाजारआधारित म्हणजेच मार्केट प्लस इकॉनॉमी अशा प्रकारची अर्थव्यवस्था आहे. त्यात असंख्य घाऊक व किरकोळ व्यापारी आहेत जे अर्थव्यवस्थेच्या सर्व स्तरांवर (ग्रामीण किंवा शहरी, गरीब व श्रीमंत) आपल्या खासगी यंत्रणेद्वारे वस्तू व सेवा पुरवितात. आणि ग्राहकांबरोबर वैयक्तिक संबंध असणे ही व्यापार सुरू राहण्यासाठी महत्त्वाची रीत राहिली आहे. मुक्त व्यापार धोरण स्वीकारल्यानंतर या विभागात विदेशी अर्थपुरवठ्यावर आधारित उद्योग व व्यवसाय साखळया यांचा शिरकाव झाला व त्यांच्या आर्थिक क्षमता आणि दर्जा व उपलब्धता या कारणांमुळे बाजारात वैविध्यपूर्ण वस्तू व सेवांचे आगमन झाले आणि समान वस्तूंच्या किमती कमी होण्यास सुरुवात झाली, पण तरीही अजूनपर्यंत ग्राहकाने या नवीन दुकानात स्वतः जाणे आवश्यक होते व आहे. यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचे बाजारआधारित स्वरूप न बदलता त्याचा विस्तार झाला आणि नवमध्यम वर्गाच्या खांद्यावर बसून त्याची व्याप्तीसुद्धा वाढत गेली. पण इंटरनेटच्या आगमनामुळे बाजाराचे संदर्भ पूर्णपणे बदलून गेले. वेबसाइटच्या उपलब्धतेमुळे प्रत्यक्ष दुकान उघडणे आवश्यक राहिले नाही. विदेशातूनसुद्धा भारतीय बाजारपेठ उपलब्ध झाली व ग्राहकांना घरबसल्या शॉपिंग करता येऊ लागले. आज ज्याला ई-कॉमर्स असं म्हटलं जातं ती अति प्रचंड उलाढाल असलेली ग्राहकोपयोगी वस्तू व सेवांची इंटरनेटच्या महाजालावर उपलब्ध असलेली बाजारपेठ आहे. आणि भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या बाजारआधारित घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांना या ई-कॉमर्स उद्योगासोबत स्पर्धा करणं अतिशय कठीण आहे कारण ग्राहक प्रत्यक्ष बाजारात जायची गरजच उरलेली नाही. ही व्यापारातील क्रांती असली तरी त्याचे दुष्परिणाम अवघ्या एक ते दीड दशकातच दिसू लागले आहेत. आज ॲमेझॉन व फ्लिपकार्ट या दोन कंपन्यांची मक्तेदारी या ई-कॉमर्स क्षेत्रात तयार झाली आहे. २०२० मध्ये ४६.१ बिलियन डॉलर इतका झालेला व्यापार हा २०२५ पर्यंत १११.४० बिलियन डॉलर इतका होईल असा अंदाज इंडियन ब्रँड इक्विटी फाऊंडेशनने वर्तवला आहे. रॉयटर संस्थेने केलेल्या शोधपत्रकारिता अहवालात ही गोष्ट समोर आली आहे की ॲमेझॉन कंपनीने एक नियोजित मोहीम राबवून बाजारपेठेतील जास्त व सतत मागणी असणाऱ्या वस्तूंची स्पेसिफिकेशन्स कॉपी करून स्वतः बनवलेल्या कंपनीच्या नावाखाली विक्री सुरू केली. तसेच मूळ उत्पादकांच्या किमतीपेक्षा थोडी किंमत कमी ठेवून व आपल्याकडे असलेल्या ग्राहकांच्या अल्गोरिदमचा वापर करून ॲमेझॉनने कॉपी केलेल्या वस्तूच ग्राहकाला दिसत राहतील अशी व्यवस्था निर्माण केली आहे. गृहोपयोगी वस्तूंच्या विभागात हे जास्त प्रमाणात केले गेल्याचे प्रकाशात आला आहे. ई-कॉमर्स यश हे प्रथमतः मोबाइल व लॅपटॉपच्या स्क्रीनवर कशा प्रकारे वस्तूंची यादी दाखवली जाते यावर त्यानंतर अचानक मोठ्या प्रमाणात डिस्काऊंट देता येणं आणि हे सर्व ज्या अल्गोरिदमवर अवलंबून आहे त्यासाठीचा डेटा ताब्यात असणं यावर अवलंबून आहे. तुमच्या मोबाइलवर लॅपटॉपच्या स्क्रीनची डोळयांना दिसणारी स्पेस (जागा) कमी असल्याने इथेच विषमता तयार होते. ही गोष्ट मुक्त व्यापाराच्या 'सर्वांना समान संधी' या तत्त्वाच्या विरोधात आहे कारण वर पाहिले त्यानुसार ॲमेझॉन किंवा फ्लिपकार्ट ई-कॉमर्स कंपन्या तुम्हाला काय दाखवायचे याचा निणय त्यांच्या फायद्याच्या दृष्टीने करत असतात. साहजिकच स्थानिक ब्रँड, उत्पादक, सेवा, दुकानदार, घाऊक व किरकोळ व्यापारी यातून मागे पडले व सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्र हा जो आपल्या अर्थव्यवस्थेचा अतिशय महत्त्वाचा भाग आहे त्याला त्याची सर्वात मोठी झळ बसली.

# राम जागवणारी क्रांती

भूदान यज्ञाच्या अनुषंगाने विचारकांनी नेमकी कोणती भूमिका घेतली होती हे साम्यवाद आणि साम्ययोग यांची तुलना करताना आपण पाहिले. भूदानाच्या वाटय़ाला स्तुतीही आली आणि टीकाही. साहजिकच टीकेचीही नोंद घ्यावी लागली. जेव्हा 'प्रथम सत्याग्रही' म्हणून विनोबांची निवड झाली तेव्हा 'विनोबा कोण आहेत?' या शीर्षकाखाली लेख लिहावा लागला होता. अर्थात स्वातंत्र्य चळवळीतील प्रमुख नेत्यांना आणि समाजातील आध्यात्मिक क्षेत्रातील अधिकारी पुरुषांना विनोबांचे महत्त्व ठाऊक होते. विनोबांचे गुरू स्वामी केवलानंद सरस्वती आणि पावसचे स्वामी स्वरूपानंद यांनी भूदान यज्ञ हे कर्मयोगाचे उत्तम उदाहरण असून विनोबा आदर्श कर्मयोगी आहेत असा निर्वाळा दिला. कॉ. बी. टी. रणदिवे ते स्वामी स्वरूपानंद असा विनोबांच्या कार्याचे महत्त्व जाणणाऱ्यांचा पैस आहे. त्याचीही नोंद इथे आली. प्रत्यक्ष भूदान यात्रा सुरू झाली आणि आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय पातळीवर विनोबांची आणि भूदानाची कीर्ती झपाटय़ाने पसरली. भूदानावर कविता लिहिल्या गेल्या. मान्यवरांचे लेख आले. या अनोख्या आंदोलनावर हिंदीमध्ये नाटकही उपलब्ध आहे. विनोबांचा आवडता कवी टेनिसन. याच्या नातवाने म्हणजे हॅलम टेनिसन याने 'इंडियाज वॉकिंग सेन्ट' या शीर्षकाखाली विनोबा आणि भूदान या दोहोंचा विस्ताराने परिचय करून दिला. टेनिसनपासून ते यदुनाथजी थत्ते, यांच्यापर्यंत श्रीनारायण, आदी मान्यवरांनी भूदान प्रवर्तक विनोबांचे चरित्र सांगितले. भूदानाचे महत्त्व विशद केले. आचार्य जावडेकर यांनी 'भूदान ही जनतेच्या हृदयातील सुप्त राम जागृत करणारी क्रांती आहे.' इतक्या नेमक्या शब्दांत भूदानाची महती गायल्याचे दिसते. या कामासाठी विनोबांचीच गरज का होती हे सांगताना आचार्य लिहितात, 'मानवी अंतःकरणातील धर्मभावनेला व आत्मप्रेरणेला जागृत करून सामाजिक क्रांती घडवून आणण्यास केवळ मुत्सद्दी किंवा समाजाचा भौतिक दृष्टीनेच विचार करणारा क्रांतिकारक पुरेसा ठरणार नव्हता. ते कार्य करण्यास एका क्रांतिकारक स्थितप्रज्ञ यतीची अथवा संताची आवश्यकता होती. असा संत विनोबांच्या रूपाने आज भारतात संचार करत आहे.

त्यांनी भारतीय जनतेची खात्री करून दिली आहे की आज समाजात सर्वांगीण क्रांती घडवून आणल्यावाचून मानवाची धर्मभावना व मोक्षवृत्ती जिवंत राहू शकत नाही. आजच्या मानवाचा भौतिक मृत्यू ओढवलेला आहे, ही खरी आपत्ती नसून त्याचा आत्मिक मृत्यू ओढवला आहे ही त्याहूनही अधिक घोर आपत्ती आहे. ही निष्ठा मानवी अंतःकरणात जागृत करून विनोबांनी सर्वांगीण क्रांतीची ज्वाला प्रज्वलित केली आहे.' भूदानाची सविस्तर नोंद घेणारे भरपूर साहित्य आज उपलब्ध आहे. त्याच वेळी बरेचसे संशोधन अद्यापही बाकी आहे, असे म्हटले जाते. कारण एका तपाहून अधिक काळ विनोबांनी, जनतेशी जो संवाद साधला त्याचे समग्र संकलन ही प्रक्रिया फार प्रदीर्घ आहे. अर्थात भूदानाच्या भौतिक इतिहासापेक्षा त्यामागचा विचार अधिक महत्त्वाचा होता आणि असेल. विनोबांच्या कल्पनेत जे 'परम साम्य' होते ते प्रस्थापित झाले नाही, हे उघडच आहे. तथापि 'परमसाम्य, शरीरश्रम आणि कांचन मुक्ती' या तत्त्वांमधूनच मानवी समाजाला निरंतर वाटचाल करावी लागेल.

# पेगॅसस, न्यायालये आणि 'पुराव्यां'चा प्रश्न!

संत महात्मे सांगून गेले आहेत की, 'दुसऱ्याचे चोरून ऐकणे म्हणजे 'कानांनी केलेली चोरी' आहे. दुसऱ्याच्या खासगी आयुष्यात डोकावून बघणे ही 'डोळ्यांनी केलेली चोरी' आहे'. परंतु, मोदी सरकारच्या विचारसरणीस हे मान्य नसावे. जर असता तर 'पेगॅसस' हे प्रकरण भारतीय जनमानसात चर्चिले गेले नसते. "भारत सरकारने पेगॅसस च्या चौकशीत सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या समितीला असहाकार्य केलेङ्ग असा शेरा स्वतः सर्वोच्च न्यायालयाने मारला नसता. 'राष्ट्रीय सुरक्षा'ही सबब न्यायालयालाही माहिती द्यायची नाही हा मोदी सरकारचा मनसुबा! इस्रायली कंपनीने बनवलेल्या 'पेगॅसस स्पायवेअर'च्या वापराबाबत केलेल्या आरोपांची शहानिशा करण्यासाठी तज्ज्ञांच्या समितीची आम्हीच स्थापना करतो, असा प्रस्ताव केंद्र सरकारने दिला होता. लॅटीनमध्ये केंद्र सरकारच्या या वर्तनावरही एक म्हण आहे – 'नेमो यूडेक्स इन काउसा सुआ'- अर्थात, कोणीही व्यक्ती स्वतःच्या खटल्यात स्वतः न्यायाधीश होऊ शकत नाही. ज्यांच्या विरुध्द, चौकशी करायची आहे, तेच समिती नेमणार? म्हणून न्यायालयाने एक समिती नेमली. मात्र या समितीच्या तपासात केंद्र सरकारने सहकार्यच केलेले नाही, हे आता नमूद झालेले आहे. 'पेगॅसस' हे लष्करी दर्जाचे 'स्पायवेअर' म्हणजे पाळत-तंत्र आहे. इस्त्रायलच्या एनएसओ ग्रूपने कोणत्याही देशाच्या केवळ 'सरकारलाच' हे तंत्रज्ञान खरेदी करता येईल या नियमानुसारच या संगणकाधारित तंत्राची विक्री आजवर केलेली आहे. मोबाइल फोनच्या वापरकर्त्याला कळणारही नाही अशा पद्धतीने हे तंत्र फोन मध्ये शिरकाव करते. एकदा का 'पेगॅसस'चा शिरकाव मोबाइल फोनमध्ये झाला की, तुमचा सर्व मोबाइल डेटा कोणत्याही क्षणी हे तंत्र पेरणाऱ्यांना पाहाता/ वापरता येऊ शकतो, तुमचा मायक्रोफोन तसेच कॅमेरा तुमच्या नकळत चालू केला जाऊ शकतो. तुमचे व्हाटसॲप तसेच अन्य प्रकारचे संदेश वाचले जाऊ शकतात. एकूण हे तंत्र वापरणे म्हणजे तुमच्या गोपनीयतेवर वरवंटा फिरवणे किंवा उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांच्या कार्यपद्धतीप्रमाणे बुलडोझर फिरवणे होय. जगभरच्या प्रख्यात १७ माध्यमांतील शोधपत्रकारांनी या प्रकरणाचा एकत्रित मागोवा घेतला. त्यांनी दिलेल्या निर्वाळयाप्रमाणे भारतातील ४० पेक्षा जास्त पत्रकारांवरही 'पेगॅसस'च्या माध्यमातून पाळत ठेवण्यात येत होती. याखेरीज संविधानिक पदावरील लोक, विरोधी पक्षांचे नेते, पक्षांतर्गत विरोधक यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी या तंत्राचा वापर केला जात असून त्यांची संख्या भारतात किमान ३०० आहे, असा या बातमीचा निष्कष.'



ही बातमी देणाऱ्यांत गाडियन, बीबीसी, अमेरिकेती न्यूयॉर्क टाइम्स, जर्मनीतील डि झीट, फ्रान्सचे ल मॉन्द, 'रॉयटर्स' ही प्रख्यात जगडव्याळ वृत्तसंस्था अशी अत्यंत विश्वसनीयतेमुळे प्रतिष्ठित ठरलेली माध्यमे होती. ही सारी माध्यमे खोटे सांगत आहेत आणि फक्त मोदी सरकार आणि गोदी मीडिया हेच खरे आहेत, असेच न्यायालयाच्या निर्णयानंतर मानायचे का ? ॲम्नेस्टी इंटरनॅशनल ही संस्था, तसेच माहिती-स्वातंत्र्याच्या खंद्या पुरस्काराबद्दल अमेरिकेलाही खुपणारा कार्यकर्ता एडवर्ड स्नोडेन यांनीही या बातमीची सत्यता पडताळलेली आहे. 'पेगॅसस' वापरले गेल्याच्या संशयाची स्वतंत्रपणे पडताळणी करणाऱ्या 'सिटिझन लॅब'चे न्यायवैद्यकीय निष्कर्ष ज्याप्रमाणे सार्वजनिक केले गेले, त्याच प्रमाणे आपल्या तांत्रिक समितीचे निष्कर्ष सार्वजनिक करणे आवश्यक आहे. 'पेगॅसस'चे सत्य समोर आल्यावर फ्रान्स, मेक्सीको, स्पेन यांनी गांभीर्याने पाठपुरावा केला. तसा मोदी सरकारने केलेला नाही. त्यामुळेच, न्यायालयाकडून आजही अशी अपेक्षा आहे की त्यांनी केवळ आपल्याच तज्ज्ञांच्या मतांवर (तीही, सरकारच्या असहकारानंतरची मते!) अवलंबून राहू नये. आंतरराष्ट्रीय दर्जाचे लष्करी हेरतंत्र उघडे पाडणे हे सोपे काम नाही. त्यासाठी आंतरराष्ट्रीय नामांकीत संस्थांचा अनुभव, तंत्रज्ञान साधने ही आपल्यापेक्षा कितीतरी प्रगत असू शकतात. न्यायालयाच्या समितीच्या अहवालाचे पुनरावलोकन व्हावे ही लोकभावना जाणून न्यायालयाने याबाबतचा निर्णय घ्यावा. गंभीर आजारांमध्ये, असाध्य रोगामध्ये आपण 'सेकंड ओपीनियन'घेतोच की! इथे 'पेगॅसस'बाबतची परिस्थिती नक्कीच गंभीर आहे. न्यायालयनियुक्त समितीने तपासलेल्या २९ मोबाईल पैकी पाच मोबाइलमध्ये 'काहीतरी' (बाह्य / संशयास्पद) सापडले आहे. पण भक्त म्हणतात हे पॅगेसस नाही! मग ते पॅगेसस आहे किंवा नाही याचा निष्कर्षही आपण परिपूर्ण कसा मानायचा? अखेर, 'निर्दोष सुटका होणे' आणि 'पुरेशा पुराव्या अभावी आरोपीला सोडून द्यावे लागणे' या दोन्ही वेगवेगळ्या बाबी आहेत. केंद्रीय स्तरावरच्या महागड्या पेगॅसस पाळतीच्याच आगेमागे महाराष्ट्र राज्यात २०१९ पर्यंत आपण 'रश्मी शुक्ला टेलीफोन टॅपिंग प्रकरण' पाहिलेले आहे. महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस चे अध्यक्ष नाना पटोले, संजय राऊत, एकनाथ खडसे , बच्चू कडू यांचे फोन खोट्या नावांनी टॅप केले गेले. हे महाराष्ट्राने पाहिलेले आहे. खोटे डिजिटल पुरावे उभारून, कठोर कायद्याच्या माध्यमातून आपल्या विरोधकांना तुरुंगवास घडवायचा हा अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरचा – जगण्यावरचा घाला आहे. भिमा कोरेगाव खटल्यात असे घडल्याची चर्चा अमेरिकेतील 'वायर्ड' या तंत्रज्ञान-नियतकालिकानेही सप्रमाण चव्हाट्यावर आणलेली आहे. हॅकींग करून बनावट पुरावे उभारल्याबाबत तकारी देखील झाल्या आहेत. पुणे पोलीसांमधील तत्कालीन सहाय्यक आयुक्तांवर त्याबाबत थेट आरोप होऊनसुद्धा कारवाई झालेली नाही. हा प्रकार म्हणजे लोकशाही चिरडण्याचाच प्रकार आहे. भारतात घडणाऱ्या या प्रकारांचा शोध पाश्चात्त्य संस्था त्यांचे तांत्रिक ज्ञान वापरूनच घेत आहे. ते ज्ञान आपण नाकारायचे का? 'आर्सेनल कन्सल्टींग' च्या अहवालानंतर अमेरिकेतील सायबर सुरक्षा संशोधन करणाऱ्या 'सेंटिनेल वन' नावाच्या संस्थने जास्त खोलात जाऊन तपास केला. त्याचा अहवाल नऊ फेब्रुवारी २०२२ मध्ये प्रसिद्ध केला. त्यात त्यांनी म्हटले आहे काही वर्षापासून हॅकर्सचा एक गट भारतातील अनेक लोकांवर डिजिटल माध्यमातून पाळत ठेवत असून 'संगणकांत बाहेरून पुरावे घुसविण्याचे' आणि मग ज्याच्या संगणकात तथाकथित पुरावे सापडले त्याला आरोपी ठरवण्याचे काम चालू आहे.

# पाकिस्तानात अस्मानी..

पाकिस्तानात आलेल्या महापुराने हाहाकार उडवला असून, मिळेल तेथून मदतीसाठी हा देश याचना करत आहे. करोना महासाथ, युक्रेन युद्ध, राजकीय अस्थैर्य, आर्थिक धोरणांच्या बाबतीत परिपक्वतेचा अभाव, चीनवर अवाजवी विसंबून राहण्याची सवय, दहशतवाद आणि दहशतवाद्यांना आसरा दिल्यामुळे आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून आणीबाणीची स्थिती वगळता पूर्णतया थांबलेली आर्थिक मदत अशा विविध घटकांमुळे पाकिस्तानी अर्थव्यवस्था गेले अनेक महिने मोडकळीस आली होती. त्यात हा पूर अवतरला असून त्याची व्याप्ती भीषण आहे. त्या देशातील १५०पैकी ११० जिल्हे पुरामुळे बाधित झाले आहेत. जवळपास ११०० नागरिक अधिकृतरीत्या मृत झाले असून, प्रत्यक्ष मनुष्यहानी त्यापेक्षा कितीतरी अधिक झाली असण्याची शक्यता आहे. सुमारे ३ कोटींहून अधिक नागरिक विस्थापित झाले आहेत. अनेक भागांमध्ये सरासरीपेक्षा खूप अधिक पाऊस दीर्घकाळ पडत होता. बलुचिस्तान आणि सिंध या राज्यांमध्ये पुराची तीव्रता अधिक असली, तरी पंजाब आणि खैबर पख्तुनवा या राज्यांनाही फटका बसला आहे. भारताप्रमाणेच पाकिस्तानातही नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांमुळे पाऊस पडतो. परंतु भारताच्या तुलनेत पाकिस्तानातील पावसाळी हंगाम अल्प असतो. कारण पर्जन्यधारी ढगांना भारत ओलांडून उत्तर दिशेने प्रवास करावा लागतो. जुलै ते सप्टेंबर असा पाकिस्तानातील पावसाळा असला तरी सक्रिय मोसमी पाऊस दीड महिनेच असतो. सरासरी पाऊस १४० मिमी असतो. ऑगस्ट महिन्यात अपेक्षित पर्जन्यमान ५४ मिमी होते, प्रत्यक्षात त्याच्या अडीचपट म्हणजे १७६.८ मिमी पाऊस झाला. सिंध प्रांतात सरासरीच्या आठपट, तर बलुचिस्तान प्रांतात तो सरासरीच्या पाचपट झाला. जवळपास आठ आठवडे अनेक भागांमध्ये अविरत पाऊस कोसळत आहे. अशा निसर्गप्रकोपासमोर प्रगत देशांनीही शरणागती पत्करली असती. पाकिस्तानसारख्या देशात तर आपत्ती व्यवस्थापन हे केवळ कागदोपत्री असते. पावसाचे अंदाज तेथील यंत्रणांनी बांधले, पण संभाव्य संकटाविषयी या यंत्रणा आणि सरकारे गाफील राहिली. त्या देशात सध्या पदच्युत पंतप्रधान इम्रान खान यांनी शक्तिप्रदर्शन सुरू केले असून, त्याला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. या प्रतिसादामुळे विद्यमान पंतप्रधान शाहबाझ शरीफ आणि त्यांचे समर्थक, तसेच सत्तारूढ आघाडीतील पाकिस्तान पीपल्स पार्टीचे नेते व समर्थक असे सगळेच अस्वस्थ झाले आहेत. राजकीय चिखलफेक आणि शह-प्रतिशहाच्या राजकारणात या मंडळींना पूरस्थितीकडे लक्ष देण्यास वेळ मिळालेला नाही. या परिस्थितीत पोप फ्रान्सिस, ब्रिटनच्या सम्राज्ञी एलिझाबेथ द्वितीय यांनी पाकिस्तानप्रति सहवेदना प्रकट केल्या. संयुक्त राष्ट्रे, जागतिक स्वयंसेवी संघटना, तुर्कस्तान, कतार, कॅनडा, संयुक्त अरब अमिराती या देशांनी आर्थिक तसेच साधनसामग्रीच्या रूपाने मदत पाठवणे सुरू केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही पाकिस्तानी नेतृत्वाशी चर्चा करून मदत पाठवण्याची इच्छा प्रकट केली आहे, ही स्वागतार्ह बाब ठरते. नैसर्गिक आपत्तींशी सामना करण्यासाठी भूराजकीय आणि ऐतिहासिक मतभेद बाजूला ठेवून मदत देऊ करणे हे राजकीय परिपक्वतेचे लक्षण आहे. या अस्मानी संकटातून बाहेर पडण्यासाठी पाकिस्तानला कदाचित काही वर्षांचा अवधी लागेल. यासाठी केवळ त्यावर लक्ष केंद्रित करून राजकीय आणि धार्मिक संकुचितपणाला तिलांजली देणे हे तेथील राज्यकर्त्यांपुढील प्रमुख आव्हान राहील.

## थोडक्यात

## पीडित शेतकऱ्यांच्या समस्येवर जन सुनावणी आयोजन

**साईनाथ दुर्गम**



**गडचिरोली :** सिरोंचा तालुक्यातील पोचमपल्ली येतील मेडिगड्डा धरणाचे पीडित शेतकऱ्यांनी गेल्या तीन वर्षांपासून भूसंपादन करा आणि नुकसान भरपाईची मागणी घेऊन अनेकानेक निवेदन शासनाला दिली होते. आणि गेल्या २३ अगस्ट पासून २६ अगस्ट पर्यत या तारखेला तहसील कार्यालय समोर चार दिवसांचे साखळी उपोषणही ही करण्यात आले होते.साखळी उपोषणाला अहेरी उप विभागीय अधिकारी अंकित यांनी सिरोंचा तालुका दौऱ्यावर येऊन मेडिगड्डा पीडित शेतकऱ्यांना सप्टेंबर २ तारखेला जण सुनावणी साठी बोलाविण्यात येईल.असे आदेश दिले. त्यानंतर पीडित शेतकऱ्यांनी साखळी उपोषण मागे घेतले. व त्याच प्रमाणे आज २ सप्टेंबर रोजी सिरोंचा तहसील कार्यलायात मेडिगड्डा पीडित शेतकऱ्यांची भूसंपादन प्रकियेच्या विषयावर मद्दीकुंठा , जानमपल्ली, आरडा, मुदुकृष्णापुर, मुगापूर, यागावातील प्रत्येकाना कार्यलायात बोलवून शेतकऱ्यांसोबत चर्चा करण्यात आली आहे, शेतकऱ्यांची जमिनीचे सर्व कागदपत्रे तपासणी करण्यात आली आहे.लवकरच मेडिगड्डा पीडित शेतकऱ्यांच्या जमिनीचे सर्वे करून भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करू व असे उप विभागीय अधिकारी अंकित यांनी उपस्थित शेतकऱ्यांना सांगण्यात आली आहे, व नंतर पिडीत शेतकरयानी मेडिगट्टा संबभधित अदिकार्याना सुधा विचारणा केले असता त्यानी म्हटलेकी येत्या ३ आक्टोबर रोजी तहसिल कार्यालय सिरोंचा येथे बैठक घेण्यात येईल असे सांगण्यात आले.पिडीत शेतकरी अधिकार्याना मान देऊन म्हटले की जर येत्या ३ अक्टोबर ला शेतकरयाचे मार्ग मोकडे केले नाही तर आम्ही मोठ्या संखेने रोडवर उतरु असे पिडीत शेतकरयानी अधिकर्याना म्हटले आहे व मिडिया समोरही म्हटले आहे. त्यावेळी सिरोंचा चे तहसीलदार जितेंद्र सिकतोडे, यांच्या सह मेडिगड्डा धरणाचे अधिकाऱ्यांनी उपस्थित होते.

## वसंतराव नाईक विद्यालयाच्या प्रयत्नाने अखेर बेलतळा गावामध्ये पोहोचली एसटी बस

**अविनाश पोहरे**





**पातुर :** पातूर तालुक्यातील बेलतळा हे गाव पातुर शहरा पासून सहा किलोमीटर अंतरावर असतांना सुद्धा येथे स्वातंत्र्यपूर्व काळापासून अद्याप पर्यंत अनेक सुविधांचा अभाव दिसून येतो. या गावाला ये-जा करण्यासाठी व्यवस्थित रोड सुद्धा नव्हता , दैनंदिन कामकाजासाठी गावक्ऱ्यांना नियमित तालुक्याच्या ठिकाणी पातुर येथे ये-जा करावे लागते, अशातच नादुरुस्त रस्ते व अशा रस्त्याच्या बाजूला दाटीवाटीने वाढलेली झाडी अशा अनेक समस्यांचा नागरिकांना सामना करावा लागत होता. गावातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान फार मोठ्या प्रमाणात होते व या समस्येची नुकतेच शासनाने दखल घेऊन रस्ता दुरुस्त केला व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये तसेच बेलतळा या छोट्याशा गावातील विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा व्हावा या उद्देशाने रामसिंग जाधव संस्थापक / सचिव यांच्या मार्गदर्शनात व वसंतराव नाईक विद्यालय व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचाय.एस.एम सौंदळे तसेच शांताराम जाधव यांनी विद्यार्थ्यांकरीता एस.टी बस सुविधा मिळावी म्हणून वारंवार पाठपुरावा केला व अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले. स्वतंत्र पूर्व काळापासून गावात बस सुविधेचा अभाव असल्यामुळे व वसंतराव नाईक विद्यालय येथील कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नाने बस सुविधा प्राप्त झाल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेमध्ये ये-जा करण्यासाठी बस अखेर २ सप्टेंबरला गावात पोहोचतच बेलतळा येथिल हिरालाल नाईक,दलपत राठोड माजी पोलीस पाटील, अर्जुन राठोड,सौ.शशिकला राठोड आदी सह गावकऱ्यांनी एस.टी वाहक व चालकांचे तसेच वसंतराव नाईक विद्यालय व विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय येथील प्राचार्य एस.एम.सौदळे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे जल्लोषात स्वागत केले व त्यांच्या करिता एस.टी बस सुविधा पुरवण्याकरिता पाठपुरावा करणाऱ्या सर्वांचे त्यांनी आभार मानले. वसंतराव नाईक विद्यालयाचे कर्मचारी शांताराम जाधव यांना सुचिता पाटेकर शिक्षण अधिकारी माध्य.,शास्त्री जिल्हा नियोजन अधिकारी, राठोड ,बुंदे डेपो मॅनेजर, अकोट विभागीय नियंत्रक राज्य परिवहन अकोला, वैशाली कावणे मानव विकास समिती, घुले गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती पातुर, निवास चव्हाण विस्तार अधिकारी पंचायत समिती पातुर आदींचे सहकार्य लाभले.

## अकोटात डेंगूच्या रुग्णांची वाढ नगरपालिका प्रशासन सुस्त

**कु.चंचल पितांबरवाले**



**अकोट :** शहरात काही भागांमध्ये स्वच्छतेचे तीन तेरा वाजले असल्याने मोठ्या प्रमाणात मच्छरांचा डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे परिणामतः मलेरिया डेंगू चिकनगुनिया सदृश्य आजारांनी नागरिकांना घेतले आहे.काल अकोटमध्ये वार्ड क्र. ५ मध्ये डेंग्यूची ७ जणांना लागण झाल्याचे समोर आल्याने एकच खळबळ उडाली आहे. मात्र नगरपालिका प्रशासन याबाबत सुस्त असल्याचे चित्र दिसत आहे यामुळे नागरिकांमध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. अकोट येथील वार्ड क्र. ५ धोबी पुरा अकोट या परिसरात अती घाणीचे साम्राज्य असल्याचे दिसते. नगरपालिका फक्त कर वसुली साठीच आहे का ?आरोग्य विभाग याकडे का दुर्लक्ष करीत आहे असे प्रश्न या मोहल्यातील नागरिक विचारत आहे. न.पा.ने वार्ड क्र. ५ मध्ये साफसफाई व फवारणी लवकरात लवकर करण्यात यावी. या परिसरातील जवळपास सात ते आठ बाल रुग्णांना खाजगी रुग्णालयात भरती केल्याचे वृत्त आहे. अधिकारणामाच्या प्रतिनिधी यांनी ब्रेकिंग टाकताच अधिकारणामा ब्रेकिंगचा इम्पॅक्ट अवघ्या तीन तासाच्या आत दिसून आला. अकोट नगरपालिकेने प्रभावित भागात फवारणी केली सुरू डासांच्या प्रादुर्भावाने शहरातील काही भागात मलेरिया डेंगू चिकनगुनिया सदृश्य तापाची लागण झाल्याचे रुग्ण आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली होती. याबाबतचे नागरिकांच्या संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करणारे वृत्त ब्रेकिंगच्या माध्यमातून प्रसिद्ध केले होते याची दखल घेऊन नगरपालिका प्रशासनाने त्वरित फवारणीस प्रारंभ केला आहे. व तशी माहिती अकोट प्रतिनिधी चंचल पितांबरवाले यांना कळविली आहे.

## माहिती अधिकार कायदा 'व्हेंटीलेटर' वरच?

**शकील खान**



**अकोला :** माहिती अधिकार कायद्यात ज्या बाबीसाठी अवघे १२० दिवस दिले होते, ती बाब १८ वर्षानंतरही अपूर्णच आहे. राज्यात हा कायदा अंमलबजावणी होत नसल्याने व्हेंटीलेटरवर आहे. दरम्यान कायद्यातील कलम ४ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, असे आदेश सामान्य प्रशासन विभागाने दिले आहेत . व कायद्यात सुद्धा तशी तरतूद आहे. तसेच देशात माहिती अधिकार कायदा १२ ऑक्टोबर २००५ रोजी अंमलात आला. तत्पूर्वी १५ जून २००५ रोजी या विधेयकावर राष्ट्रपतींची स्वाक्षरी झाली होती. या तारखेपासून तर १२ ऑक्टोबरपर्यंत सर्व शासकीय कार्यालयांनी कायद्यातील कलम च्या ४ तरतुदीनुसार(१७) सतरा मुद्यांची माहिती स्वताहून जनतेसाठी प्रसारीत करणे कायद्याने बंधनकारक होते. ज्या दिवशी म्हणजे १२ ऑक्टोबर रोजी कायद्याची अंमलबजावणी देशात सुरू होईल. त्या दिवशीपर्यंत सर्व शासनाचे प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आदेश द्यावेत. सार्वजनिक प्राधिकरणांची अद्ययावत माहिती, निर्देश सूची तयार होणे आवश्यक होते. प्राधिकरणामध्ये माहिती अधिकाराचे प्रशिक्षण देण्यात आले आहेत. या कलमातील तरतुदींचे पालन १२० दिवसात कोणीच केले नाही. त्यानंतर देशातील व राज्यातील सर्व सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये माहिती अधिकाराचे प्रशिक्षण देण्यात आले. एकदा नव्हे तर अनेकदा राज्यातील सर्वच प्राधिकरणांमध्ये कायद्याचे प्रशिक्षण देत असताना कलम ४ ची पूर्तता करण्याचे निर्देश देण्यात आले होते. आपल्या कार्यालयासाठी कलम ४ ची पूर्तता किती आवश्यक आहे. हेही सांगण्यात आले. आज कायदा अस्तित्वात येऊन १८ वर्षे पूर्ण झाली आहेत परंतु कलम ४ ची पूर्तता बोटावर मोजण्या इतक्या प्राधिकरणांनी केली आहे. हे देशासाठी ,लोकांसाठी दुर्दैवाची बाब असून या गंभीर बाबीकडे शासनाने व वरिष्ठ अधिका्यांनी तथा देशाच्या लोकआयुक्त यांनी त्वरित लक्ष घालण्याची मागणी निभय बनो जनआंदोलन चे संयोजक तथा समाजसेवक गजानन हरणे यांनी केली आहे.

## कात्रज घाट वनक्षेत्रात बिबट्याचे वास्तव्य

**ज्ञानेश्वर कापसे**



**पुणे :** कात्रज घाट परिसरातील भिलारेवाडी वनविभागात गेल्या पंधरा दिवसांत चार वेळा बिबट्याचे दर्शन झाल्याने यावेळी बिबट्याचा मुक्काम वाढल्याचे दिसत आहे परिणामी , घाट रस्त्याने प्रवास करणारे दुचाकीस्वार व लगतच्या नागरी वस्तीतील नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन वन विभागाच्या वतीने करण्यात येत आहे . भिलारेवाडी वन विभाग ७५० हेक्टर क्षेत्रावर विभागाला आहे . उंच डोंगर , विस्तीर्ण झाडी , पाझर तलाव यामुळे वन्यजीवांचा अधिवास आहे . मोर , माकड , रान डुक्कर , ससे अशा वन्यजीवांसह बिबट्याचे वास्तव्य आढळून येते . अनेक वेळा बिबटे व बछडे पाहायला मिळाले आहेत . वन विभागालगत भिलारेवाडी , गुजर निंबाळकरवाडी भागात नागरी वस्ती झपाट्याने वाढली आहे, तसेच नाही. कात्रज घाटात आढळलेला बिबट्या . अनेक शेतकरी , शेतमजूर व नागरिकांची या भागात भटकंती असते . यापूर्वी गाई , वासरे व पाळीव कुत्र्यांवर हल्ले झाल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे नागरिकांतून भीती व्यक्त होत आहे. भिलारेवाडी वनक्षेत्र मोठे असून , वन विभागातील वरिष्ठांचे नेहमीच दुर्लक्ष होते. बिबट्यावर लक्ष ठेवून खासगी जागेत दिसताक्षणी जेरबंद करावे , अशी मागणी नागरिकांतून वारंवार होत आहे. या संदर्भात रेंजर फॉरेस्ट ऑफिसर सणस यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी फोन उचलला नाही.

## महालक्ष्मी माता मंदीरात यात्रा महोत्सवाचे आयोजन

**कु.चंचल पितांबरवाले**



**अकोट :** तालुक्यातील ग्राम पणज येथील महालक्ष्मी माता मंदीरात दरवर्षी प्रमाने याही वर्षी ज्येष्ठ गौरी आव्हान निमित्त सतत तीन दिवस मंदीरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच रविवार दिनांक ४ ऑगस्ट २०२२ ला यात्रा महोत्सव व महाप्रसादाचे आयोजन समस्त गावकरी मंडळी पणज यांच्या तर्फे करण्यात आले आहे, पणज ग्रामस्थांचे ग्राम दैवत व भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री महालक्ष्मी माता मंदीराची महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात ओळख आहे.मागील दोन वर्षे कोरोना चा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने यात्रा महोत्सव हा कार्यक्रम शासनाच्या आदेशानुसार रद्द करण्यात आला होता. या वर्षी सर्व सुरळीत चालू असल्याने यात्रा महोत्सव साजरा होत आहे. सात पुडा पर्वताच्या पायथ्याशी तसेच बोर्डी नदीच्या काठावर असलेल्या श्री महालक्ष्मी माता मंदीरात दरवर्षी प्रमाने याही वर्षी भजन पुजन दर्शन महाप्रसाद तथा विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन सर्व भाविकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे यात्रा आयोजन समिती व समस्त गावकरी मंडळी पणज यांनी कळविले आहे.

## शेतकरी कार्डधारकांना मिळणारा गहू गायब

**सुमित सोनोने**

**मुर्तिजापूर :** गोरबरीब,दारिद्र्य रेषेखालील नागरिकांना स्वस्त धान्य दुकानातून वितरणाची योजना राबवली जात आहे. याअंतर्गत लाभार्थ्यांना तांदूळ,गहू,साखर आदी रेशन वितरण करण्यात येते.



सदर रेशनचे गोरगरिबांच्या आयुष्यात महत्त्व आहे. मात्र जुलै आणि ऑगस्ट महिन्यातील गव्हाचा पुरवठा रेशन दुकानातदारांना झाला नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. वरिष्ठ स्तरावरूनच गव्हाचा पुरवठा करण्यात न आल्याने सदर परिस्थिती ओढावली आहे.ऐन सणासुधीच्या काळात गहू मिळणे बंद झाल्याने गोरगरिब शेतकरी कार्ड धारकांना कार्डवर गहू मिळणे बंद झाले आहे. शासन स्तरावरून गव्हाचा अनियमित पुरवठा होत असल्याने जून महिन्यातील गहू लाभार्थ्यांना उशिरा वाटप करण्यात आला. मात्र जुलै ऑगस्ट महिन्याचा गहू योग्य प्रमाणात वाटप करण्यात आला नाही. पोळा सण नुकताच आटोपला आता गणेशोत्सवाला सुरुवात झाली आहे.सर्वत्र धार्मिक सणासुदीत

**• खाजगी दुकानातून गहू खरेदी**

दैनंदिन जेवणात प्रत्येक घरी होळीचा उपयोग केला जात असल्याने नागरिकांना पोळीची सवय जडली आहे.मात्र,जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानात या महिन्याचे गहू वितरण करण्यात आलेले नाही.परिणामी शेतकरी कार्ड धारकांना गहू मिळणे बंद झाले आहेत.नाईलाजास्तव लाभार्थ्यांना खाजगी दुकानात अधिकची रक्कम मोजून गहू खरेदी करावे लागत आहेत.दुकानात 28 रुपयांपासून तर 40 रुपये प्रति गहू विक्रीस उपलब्ध आहेत.परिणामी गोरगरिबांना आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे.

**• लाभार्थ्यांवर नवे संकट**

मागील काही वर्षापासून सातत्याने महागाई वाढली आहे.यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह गरीबांचे जीवन जगणे कठीण होऊन बसले आहे. वर्तमानकाळात जीवनावश्यक वस्तूंसह विविध साहित्यांच्या किमतीत वाढ झाली असल्याने नागरिकांना आर्थिक संकटांना तोड द्यावे लागत आहे.या महागाईच्या काळात गोरगरीबांसाठी स्वस्त धान्य दुकानातून प्राप्त होणाऱ्या रेशनचा मोठा आधार होत आला आहे.मात्र,स्वस्त धान्य दुकानातून प्राप्त होणारे गहू बंद करण्यात आल्याने गोरगरिबांवर नवे संकट कोसळले आहे.

लाभार्थ्यांना गहू मिळत नसल्याने लाभार्थ्यांमध्ये तीव्र संपला व्यक्त केला जात आहे. याकडे जिल्हा प्रशासनाने व लोकप्रतिनिधींनीही लक्ष देत नसल्याने सण उत्सव गेल्यानंतर गहू वाटप करणार का असा संतप्त सवाल लाभार्थी उपस्थित करीत आहे.

## हद्दपार तरुणाचा पोलिसावर जीवघेणा हल्ला



**दै. अधिकारनामा**

**धुळे :** प्रांताधिकारी यांनी हद्दपार करुनही संशयित रोहित रविकांत सानप हा देवपुर भागात फिरत असताना पोलिसांनी पकडले. त्याचा राग येऊन त्याने कोयत्याने पोलिसांवर हल्ला केल्याची घटना देवपुरातील विघ्नहर्ता कॉलनीत घडली. यात एक पोलीस कर्मचारी जखमी झाला आहे. दरम्यान, रोहित सानप याच्याविरोधात रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास गुन्हा दाखल झाला. गणेशोत्सवात कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी प्रांताधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी रोहित रविकांत सानप (वय २६, रा. विघ्नहर्ता कॉलनी, देवपूर) याला ३१ ऑगस्ट ते १० सप्टेंबर पावेतो शहरात प्रतिबंध केलेला आहे. यासंदर्भात देवपूर पोलिसांमार्फत नोटीस देखील देण्यात आलेली आहे. असे असताना देखील शुक्रवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास तो देवपूर भागात फिरत असल्याची गोपनीय माहिती देवपूर पोलिसांना मिळाली. त्यानुसार, त्याला पकडण्यासाठी पोलीस कर्मचारी भरत कोष्टी व शोध पथकातील मिलींद सोनवणे, शशिकांत देवरे, मुकेश वाघ, किरणकुमार साबळे आणि चव्हाण यांचे पथक रवाना झाले. पोलिसांना पाहून त्याने कोयता हातात घेऊन पोलिसांवर जीवघेणा हल्ला केला. यात भरत कोष्टी यांना गंभीर दुखापत झाली. पोलिसांनी सापळा लावून रोहित सानप याच्या मुसक्या आवळल्या. पोलीस कर्मचारी भरत कोष्टी यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. रोहित सानप याच्याविरोधात रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास गुन्हा दाखल झाला. रोहित सानप याला अटक केली आहे.

## विजेचा धक्का लागून शेतकऱ्याचा जागीच मृत्यू

**मोहन चुन्ने**



**लाखांदूर :** कृषिपंपाचा वीजपुरवठा नादुरुस्त असल्याने ट्रान्सफार्मरवर डिओ टाकीत असताना विजेचा धक्का लागून शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना (दि.२) सकाळी लाखांदूर तालुक्यातील चिचोली येथे घडली. शरद यादवराव धोटे (वय ३२, रा. भागडी) असे मृत शेतक्ऱ्याचे नाव आहे. भागडी येथील शरद यादव धोटे हा शेतकरी चिचोली शेतशिवारातील धान पिकाला पाणी देण्यासाठी गेला असता कृषीपंपाची वीज नादुरुस्त होती. यापूर्वी नादुरुस्तीची तक्रार वीज वितरण कंपनीकडे करण्यात आली होती. मात्र वारंवार दुर्लक्षित करीत असल्यामुळे शरद स्वतःच ट्रान्सफॉर्मरवर डीओ टाकण्यासाठी चढला. अचानक ट्रान्सफार्मरवरील विजेचा जोरदार धक्का लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. बराच वेळपर्यंत तो ट्रान्सफॉर्मरवरच पडून होता. ही घटना माहित होताच गावकऱ्यांनी मोठी गर्दी केली. वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना बोलवा, तेव्हाच मृतदेह खाली काढा, असा पवित्रा नागरिकांनी घेतल्याने वीज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अधिकारी दखणे, सहायक अभियंता हेमके व विद्युत तंत्रज्ञ घटनास्थळी दाखल झाले. शरदचा मृत्यू हा वीज वितरण कंपनीच्या दुर्लक्षामुळे झालेला आहे. त्यामुळे त्याच्या कुटुंबाला आर्थिक नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. शरदच्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी, आईवडील असा परिवार आहे.

## सेंट पॉल अकॅडमीचे विद्यार्थ्यांची जिल्हास्तरासाठी निवड

**जितेंद्र लखोटिया**



**हिवरखेड :** येथे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आलेल होत या प्रदर्शनीचे आयोजन सहदेवराव भोपळे विद्यालय हिवरखेड येथे करण्यात आलेले होतो या विज्ञान प्रदर्शनीमध्ये तालुक्यातील बहुसंख्य शाळांनी सहभाग घेतला होता. यामध्ये सेंटपॉल अकॅडमी हिवरखेडचे इयत्ता सातवीचे विद्यार्थी सौम्य निलेश मगर व रुद्राक्ष विलासराव घुंगड या विद्यार्थ्यांनी फार्मर्स सेफ्टीसाठी एक मॉडेल बनवले होते. यामध्ये आपण बऱ्याचदा पाहतो की पावसाळ्याच्या दिवसांमध्ये शेतात हवेमुळे, वादळामुळे इलेक्ट्रिकचे तार तुटून पडलेले असतात आणि शेतकऱ्यांना याची माहिती नसते तर या संबंधीची सूचना शेतकऱ्यांना मिळावी यासाठी हे मॉडेल तयार करण्यात आलेले होते. यामधून शेतकऱ्यांना शेतामध्ये एखादा तार पडलेला असेल आणि त्यामध्ये जर विद्युत प्रवाह असेल तर त्याची सूचना त्यांना आजूबाजूच्या इलेक्ट्रिक पोल वरील सर्व लाईट ऑन झालेले असतील किंवा लागलेले असतील तसेच जोरजोरात हॉर्न वाजेल ज्यामुळे काहीतरी संकट किंवा धोका आहे याची सूचना शेतकऱ्यांना मिळणार आहे या मॉडेलसाठी विद्यार्थ्यांचा तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी मध्ये द्वितीय क्रमांक आला असून त्यांची निवड जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनी साठी झालेली आहे.त्याचबरोबर जय आनंद वानखडे व सुरज सुशील इंगळे या दहावीच्या विद्यार्थ्यांनी हायवे वर किंवा घाटामध्ये होत असणाऱ्या मोठमोठे एक्सीडेंट रोखण्यासाठी त्यांनी हे मॉडेल तयार केले होते यामध्ये जर एखाद्या गाडीचा अपघात होत असेल तर तो अपघात होण्याअगोदरच त्या गाडीचे हायड्रोलिक पूर्णतः जमिनीला टेकून जाईल यामुळे जीवित हानी होणार नाही व ज्या गाडीचा एक्सीडेंट होणार आहे ती गाडी जागेवरच थांबून जाईल म्हणजे होणारी मोठी जीवित हानी या मधून आपल्याला रोखता येईल. मॉडेलसाठी या विद्यार्थ्यांचा तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीमध्ये चतुर्थ क्रमांक आलेला असून यांची निवड जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनीसाठी झालेली आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शनी मध्ये सेंट पॉल ल अकॅडमीचे विद्यार्थी आपल्या मॉडेल्सच्या माध्यमातून वेगवेगळे विषय समोर घेऊन त्यावर अत्यंत समर्पक असं उत्तर किंवा उपाय सुचवण्याचा प्रयत्न करत असतात असे या विज्ञान प्रदर्शनीतून दिसून आलं. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाचे कौतुक संस्थेचे अध्यक्ष प्राध्यापक नवनीतजी लखोटिया, संस्थेचे उपाध्यक्ष लूणकरंजी डागा तसेच संस्थेचे सचिव प्रमोदजी चांडक यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच शाळेचे मुख्याध्यापक चंद्रकांत तिवारी यांनी विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांनी आपल्या या यशाचे श्रेय शाळेतील विज्ञान शिक्षकांना तसेच आपल्या आई-वडिलांच्या मार्गदर्शनाला दिलेले आहे.

## थोडक्यात

## नाथसागर धरणाचे आपत्कालीन दरवाजे झाले बंद



**दै. अधिकारनामा**

**औरंगाबाद** : पैठण येथील नाथसागर धरणाचे दरवाजे शुक्रवारी (दि. २) उघडण्यात आले होते. यातील आपत्कालीन दरवाजा क्र २ ते ८ हे आज दुपारी १२ वाजता पुन्हा बंद करण्यात आले. सध्या १८ दरवाजे चार फूट खुले ठेवले असून, गोदावरी नदी पात्रात ७५ हजार ४५६ क्युसेकने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. शुक्रवारी (दि. २) नाथसागर धरणाच्या वरील भागातून दिवसभर प्रचंड वेगाने धरणात पाण्याची आवक झाली होती. त्यामुळे पाटबंधारे विभागाच्या धरण प्रशासनाने रात्री नऊ वाजण्याच्या दरम्यान धरणाचे आपत्कालीन दरवाजे खुले करून गोदावरी नदीत २५ दरवाजातून विसर्ग सोडण्यात आला होता. परंतू आज (शनिवार) सकाळपासूनच धरणात येणाऱ्या पाण्याची आवक मंदावल्याने धरण शाखा अभियंता विजय काकडे यांनी उघडलेली आपत्कालीन २ ते ८ या क्रमांकाचे दरवाजे दुपारी बारा वाजता पूर्णतः बंद करण्याचा निर्णय घेतला. गोदावरी नदीत सध्याच्या परिस्थितीत १८ दरवाजे चार फूट उघडे ठेवून ७५ हजार ४५६ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू ठेवण्यात आला आहे. शुक्रवारी दुपारी बारा वाजता धरण नियंत्रण कक्षात नोंद केल्यानुसार एकूण पाणीसाठा २८७७. ९९० असून, वरील धरणातून ६८ हजार ४१६ क्युसेक पाण्याची आवक होत आहे. त्यामुळे धरणाची टक्केवारी ९८.५७ एवढी झाली आहे.

## मुलांची हत्या करणाऱ्या बापाने केली आत्महत्या



**दै. अधिकारनामा**

**चंद्रपूर** : बेरोजगारीने त्रस्त असलेल्या बापाने दोन मुलांचा खून केल्याची घटना काल (शुक्रवारी) वरोरा शहरालगत असलेल्या बोर्डा येथे घडली होती. मुलांच्या हत्येनंतर बापानेही समुद्रपूर तालुक्यातील कोरा साखरा या मूळ गावी आत्महत्या केली. संजय कांबळे (वय ४०) असे त्याचे नाव आहे. मिष्ट्री संजय कांबळे (वय ३) व अस्मिन संजय कांबळे (वय ५) अशी त्याने खून केलेल्या मुलांची नावे आहेत. संजय कांबळे हा शिक्षित होता; परंतु त्याचे ट्र्युशन क्लॅसेस बंद झाले. तो बेरोजगारीमुळे वैफल्यग्रस्त झाला होता. आर्थिक स्थितीने तो काही महिन्यांपासून मानसिक तणावाखाली होता. संजय कांबळे याची पत्नी सविता डी फार्मसी कॉलेजमध्ये कंत्राटी तत्वावर आठ दिवसांपासून कामाला जात होत्या. मुळचे समुद्रपूर तालुक्यातील साखरा येथील संजय कांबळे हे वरोरा शहरालगत असलेल्या बोर्डा या गावी भाड्याने राहत होता. त्याच गावी आजोबा राहत असल्याने मुलगा अस्मिन त्यांचेकडे राहत होता. शुक्रवारी दुपारच्या सुमारास संजयने अस्मिनला घरी घेऊन गेला. यावेळी पत्नी कामावर गेली होती. संजयने दोन्ही मुलांना विष पाजले. त्यानंतर त्यांचा गळा आवळून खून केला. त्यानंतर तो घरातून फरार झाला. सायंकाळी मुलांची आई घरी आली तेव्हा घटना उघडकीस आली. या घटनेची वरोरा पोलिस ठाण्यात नोंद झाली आहे.

मुलांची हत्या करून संजय आपल्या मुळ गावी कोरासाखरा येथे गेला होता. आज त्यानेही आत्महत्या केली. मुलांच्या मृतदेहाजवळ त्याने एक चिठ्ठी लिहून ठेवली होती. त्यामध्ये आपणच मुलांची हत्या केल्याचे त्याने म्हटले आहे. याकरीता घरच्या लोकांना त्रास देऊ नये, असेही लिहून ठेवले आहे. मात्र हत्या का केली याचे कारण त्याने लिहीण्याचे टाळले. त्याचा मृतदेह मंगरूळ रत्यानजीक आढळून आला. या प्रकरणाचा तपास वरोरा

## लोहगाव येथे तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या



**दै. अधिकारनामा**

**औरंगाबाद** : पैठण तालुक्यातील लोहगाव येथील (३० वर्षीय) तरुणाने गळफास घेऊन आज (शनिवार) सकाळी आत्महत्या केल्याची घटना घडली. दरम्यान आत्महत्या करण्याचे कारण मात्र अस्पष्ट असून, मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव गणेश सुभाष मुसळे (रा. लोहगाव, ता. पैठण) असे आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या लोहगाव येथील गणेश सुभाष मुसळे (वय ३० वर्ष) या तरुणाने आज सकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली.

सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष माने यांना याची माहिती मिळाल्यावर त्यांनी तात्काळ सहाय्यक फौजदार तांगडे यांच्यासह पोलीस पथक घटनास्थळ पाठवून पंचनामा करण्याचा आदेश दिला.सदरील तरुणाला बिडकीन येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून त्याला मृत घोषित केले. या घटनेची बिडकीन पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष माने हे सदरील तरुणाने आत्महत्या का केली याबाबत पुढील तपास करीत आहेत.

## जोतिरादित्य शिंदे यांनी घेतले श्री जोतिबाचे दर्शन



**दै. अधिकारनामा**

**कोल्हापूर** : केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री जोतिरादित्य शिंदे शनिवारी (दि. ३) कोल्हापूर जिल्हा दौऱ्यावर आहेत. शनिवारी सकाळी साडेनऊ वाजता कोल्हापूर विमानतळावर त्यांचे आगमन झाले. सकाळी ११ च्या सुमारास त्यांनी वाडी रत्नागिरी येथे जाऊन दख्खनचा राजा श्री जोतिबाचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांनी अंबाबाईचे दर्शन घेतले. दरम्यान, आज दुपारी कृषी महाविद्यालय वसतिगृहातील राजमाता विजयाराजे शिंदे यांच्या तैलचित्राचे त्यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

## शिवसेनेच्या कार्यक्रमात शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांचा हल्ला



**दै. अधिकारनामा**

**बुलढाणा** : शिवसेनेतील ठाकरे गट आणि शिंदे गटातील संघर्ष आता गुद्द्यांवर गेला आहे. स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समिती सभागृहात सुरु असलेल्या कार्यक्रमावर शिंदे गटातील कार्यकर्त्यांनी हल्ला करून कार्यक्रम उधळण्याचा प्रयत्न केला. यावेळी बंदोबस्तावरील पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतली, असा आरोप शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केला आहे. तर शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी हा हल्ला करण्यामागील कारण अद्याप समोर आलेले नाही. शिवसेना उपनेते लक्ष्मण वडले यांच्या हस्ते जिल्हा कार्यकारिणीतील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ सुरु होता. यात शिवसेनेचे संपर्क प्रमुख नरेंद्र खेडेकर, सहसंपर्क प्रमुख छगन मेहेत्रे, जिल्हा प्रमुख जालिंधर बुधवत, उपजिल्हाप्रमुख संजय हाडे यांच्यासह उपनेते लक्ष्मण वडले यांनाही धक्काबुक्की करण्यात आली. विशेष म्हणजे तगडा पोलीस बंदोबस्त असताना हा हल्ला झाला.

जिल्हा संपर्क प्रमुख नरेंद्र खेडेकर यांनी सांगितले की, हल्ला करणाऱ्यात आमदार संजय गायकवाड यांचे पुत्र कुणाल गायकवाड तसेच त्यांचे सहकारी कार्यकर्ते आघाडीवर होते. याबाबत व्हिडिओ फुटेज उपलब्ध झाले आहेत. ज्यात कुणाल गायकवाड स्पष्ट दिसत आहेत. जवळपास १५ मिनिटे हा दादागिरीचा प्रकार सुरू होता. यावेळी शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी खुर्च्यांची फेकाफेक केली. आणि शिवसेना पदाधिकाऱ्यांना लाथाबुक्क्या मारल्या. उपजिल्हा प्रमुख संजय हाडे यांच्या पोटात लाथ मारण्यात आली. तसेच सहसंपर्क प्रमुख छगन मेहेत्रे यांनाही मारहाण झाली. हल्ल्याच्या या घटनेनंतर पोलिसांची अतिरिक्त कुमक दाखल झाली. मात्र हल्ला करून शिंदे गटातील कार्यकर्ते पसार झाले. दरम्यान, यावेळी बंदोबस्तावरील पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतली, असा आरोप शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केला आहे. शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी

## 'लम्पी'चा राहुरीत २० जनावरांना विळखा, ११ हजार जनावरांना दिली लस



**दै. अधिकारनामा**

**राहुरी** : राहुरी तालुक्यात तीन गावांमध्ये तब्बल २० जनावरे लम्पी आजाराच्या विळख्यात सापडल्याचे निष्पन्न झाल्याने पशू पालकांमध्ये निराशेचे चित्र दिसत आहे. दरम्यान, पशू वैद्यकीय विभागाने आजाराची तातडीने दखल घेत पाच किलोमीटर अंतरावरील ११ हजार जनावरांना तातडीने लस दिली. गोपालक लम्पी आजाराने संकटात सापडले आहेत. पशू वैद्यकीय विभागाने जनावरांच्या स्वच्छतेबाबत काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. जिल्ह्यामध्ये लम्पी आजाराचे थैमान वाढत आहे. जनावरांच्या बाजारावर बंदी लादल्यानंतर गावोगावी तपासणी व लस टोचणी मोहीम पशू वैद्यकीय विभागाने सुरू केली. याबाबत तालुका पशू वैद्यकीय अधिकारी डॉ. अमरप्रसाद माने यांनी सांगितले की, मानोरी व मुसळवाडी गावामध्ये प्रत्येकी जनावरे लम्पी आजाराने बाधित असल्याचे आढळले. चांदेगावामध्ये २० जनावरे बाधित आढळले. सर्व जनावरांची काळजी घेतली जात आहे. संबंधित गावाच्या ५ कि. मी. त्रिज्येनुसार लसीकरण मोहीम हाती घेण्यात आली आहे. २० हजार जनावरांपैकी ११ हजार जनावरांचे लसीकरण पूर्ण झाले.

लम्पीचा मानवी जीविताला कोणताही धोका नाही. या आजारामध्ये जनावरांचे मृत्यूचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे गोपालकांनी काळजी करू नये. जनावरांबाबत कोणतीही अडचण असल्यास तातडीने पशू वैद्यकीय विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन पशू वैद्यकीय विभागाकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, राहुरी परिसरात लम्पीचा विळखा वाढत असल्याने गोपालक चिंताक्रांत झाले आहेत. हा आजार विषाणू जन्य व संसर्गजन्य असल्याने शेतकऱ्यांनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. या आजारामध्ये मृत्यू प्रमाण कमी असले, तरीही दुभत्या संकरित गायींच्या उत्पादनात होणारी घट, तर दुसरीकडे औषधांचा अधिकचा खर्च हा गोपालकांसाठी चिंतेची बाब ठरत आहे. राहुरीमध्ये २० जनावरांना लम्पीची बाधा झाल्याचे समजताच संसर्ग होऊ नये म्हणून पशू वैद्यकीय विभागाकडून दखल घेतली जात आहे. परिघातील ११ पैकी ९ हजार ८७ जनावरांचे लसीकरण झाले आहे. पशू वैद्यकीय विभागाला मागणीप्रमाणे लस उपलब्ध होत आहे. करंज व निम तेल एकत्र करीत त्यामध्ये साबण किंवा शॅम्पू टाकत मिश्रण तयार करावे. तयार झालेल्या द्रव्याची फवारणी जनावरे व परिसरात करावी. त्यामुळे डास, गोचीड व माशांची संख्या कमी होईल, अशी असे पशू वैद्यकीय अधिकारी डॉ. माने म्हणाले.

पशू वैद्यकीय विभागाने खासगी पशू वैद्यकीय डॉक्टरांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे. एका गोठ्यातील निडल दुसरीकडे वापरू नये. कोठेही 'लम्पी'चे जनावरे आढळल्यास त्याची माहिती तातडीने शासकीय पशू वैद्यकीय प्रशासनाला द्यावी, असे म्हटले आहे.

## सधन कुटुंबांचे रेशन कार्ड होणार रद्द



**दै. अधिकारनामा**

**औरंगाबाद** : बंगले आणि चारचाकी वाहन असलेल्या सधन कुटुंबीयांकडेही पिवळे, केशरी रेशन कार्ड आहे. शिवाय ते नियमितपणे धान्याचा लाभही घेत आहेत. त्यामुळे सध्या अनेक पात्र लाभार्थी योजनेच्या धान्यापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्रालयाकडून या सधन कुटुंबीयांना लाभाचे रेशनकार्ड रद्द करून पांढरे रेशन कार्ड दिले जाणार आहे. त्यासाठी प्रत्येक रेशन दुकानातून अशा कुटुंबीयांचे अर्ज भरणा करून घेण्यात येत आहेत.

जिल्ह्यात ७ लाख ३२ हजार २४५ रेशन कार्डधारक आहेत. यांत धान्याचा लाभ हा केवळ ४ लाख ७५ हजार ४२४ रेशन कार्डधारकांना मिळतो. त्यातही हजारो रेशन कार्डधारक हे सधन असून, शासनाच्या नियमानुसार त्यांचे वार्षिक उत्पन्न हे लाखोंच्या घरात आहे, परंतु, असे असतानाही अनेकजण आजही रेशन धान्याचा लाभ घेत आहेत. या तांदूळ व गव्हाची तो नियमितपणे उचल करत आहेत, परंतु काहीजण या धान्याकडे दुर्लक्ष करत आहेत. कोरोना महामारीत अनेकांना रेशनच्या धान्याचे महत्त्व कळाले आहे.

लॉकडाउनमुक्त जिल्हा होताच अनेकांनी रेशन कार्ड काढण्यास सुरुवात केली, परंतु जिल्ह्याला वाढीव धान्य कोटा मिळत नसल्याने या नव्या रेशन कार्डधारकांपैकी जे खरेच योजनेच्या धान्यासाठी पात्र आहेत, त्या अनेकांना लाभापासून वंचित राहावे लागत आहे. यासाठी जिल्हा पुरवठा विभागाने वाढीव कोट्याची मागणी देखील शासनाला केली आहे. परंतु, अद्याप त्यास मंजुरी मिळालेली नाही. दरम्यान, केंद्राने ज्याप्रकारे गॅस सिलिंडरवरील सबसिडी सधन कुटुंबीयांनी स्वतःहून परत करावी, असे आवाहन केले होते. तसेच आवाहन आता रेशन कार्डधारक सधन कुटुंबीयांना केले आहे. या कुटुंबाने स्वतःहून रेशनचा लाभ परत करावा. तसेच पांढरे रेशन कार्ड घ्यावे, असे आवाहन केले आहे.शासनाने सध्या आवाहन केले आहे. त्यासोबतच रेशन दुकानदारांना सधन कुटुंबीयांकडून सक्तीने लाभ परत करण्याचे अर्ज भरून घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार गेल्या महिनाभरापासून रेशन दुकानदार ही मोहीम राबवत आहेत, परंतु ई-पॉज मशिनच्या घोळामुळे रेशन धान्यवाटप प्रक्रिया रखडल्याने गेल्या महिन्यात मोहीम सुरू होण्यास विलंब झाला. या महिन्यात धडक मोहीम राबवण्यात येणार असल्याचे काही रेशन दुकानदारांनी सांगितले. घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरवरील सबसिडी सधन कुटुंबीयांनी परत करावी, यासाठी जसे आवाहन केले होते, अगदी तशीच मोहीम रेशनच्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या सधन कुटुंबीयांविरोधात सुरू केली आहे. त्यांनादेखील लाभ परत करण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे. रेशन कार्डशी आधार लिंक असल्याने ही माहिती प्रशासनाला त्वरित उपलब्ध होऊ शकते, परंतु नागरिकांनी स्वतःहून सहकार्य करावे, यासाठी ही मोहीम आहे, अशी माहिती जिल्हा पुरवठा

## चेनस्नॅचर्ससह चोरीचे सोने विकत घेणाऱ्या सोनाराला ठोकल्या बेड्या

**दै. अधिकारनामा**

**नाशिक** : सातपूर परिसरात महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी ओरबडणा्या २८ वर्षीय चैन स्न्रॅचरसह चोरीचे सोने विकत घेणाऱ्या ३३ वर्षीय सोनारास सातपूर पोलिसांनी अटक केली आहे. या बाबत सातपूर पोलिसांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. चंद्रकांत केदारे (२८) असे चेन स्न्रॅचरचे नाव असून कृष्णा दिलीप टाक (३३) असे चोरीचे सोने विकत घेणा्या सोनाराचे नाव आहे. सातपूरच्या श्रमिकनगर परिसरात राहणाऱ्या चंद्रकांत कौतिक केदारे याने भर दिवसा महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी ओरबाडण्याचा धडाका लावला होता. श्रमिकनगर परिसरात लागोपाठ तीन दिवस महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी ओरबाडण्याच्या घटनांमुळे पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले होते. ३० ऑगस्ट रोजी राधाकृष्णनगर चौकातून मुलांना शाळेत सोडण्यासाठी पायी जाणाऱ्या प्राची पुरुषोत्तम बाबर या महिलेच्या गळ्यातील ३३ हजार रुपये किमतीची सोन्याची पोत मोटरसायकलवरून आलेल्या चोरट्याने ओरबाडली होती.सातपूर परिसरात चंद्रकांत केदारे याने तीन ठिकाणी महिलांच्या गळ्यातील सोने ओरबडले असून पोलीसांनी सापळा रचून त्याला मुद्देमाल तसेच चोरीत वापरलेली मोटर सायकल जप्त करुन अटक केली. त्याच्याकडून अजूनही सात ते आठ गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. पोलीस उपायुक्त विजय खरात, सहाय्यक आयुक्त सोहेल शेख, सातपूरचे वरिष्ठ निरीक्षक महेंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत नागरे यांनी तीन वेगवेगळी पथके तयार करून परिसरातील सीसीटीव्हीचे बारकाईने निरीक्षण केले.

सोनसाखळी चोराने परिधान केलेले कपडे व त्याच्याकडे लाल काळ्या रंगाचे हेल्मेट, तसेच होंडा शाईन मोटरसायकल व टाकीला लाल पट्टे असल्याचे निष्पन्न झाले होते. डी. बी. पथकाच्या तीन टीम श्रमिकनगर, कार्बन नाका व राधाकृष्णनगर भागात संशयिताचा शोध घेण्यासाठी कार्यरत होत्या. याचवेळी श्रमिक नगर मधील हिंदी शाळेच्या परिसरात वरील वर्णनाचा संशयित डी.बी. पथकातील कर्मचारी विनायक आव्हाड व सागर गुंजाळ यांना दिसला. त्याला थांबवण्याचा प्रयत्न करताच तो जोरात पळून जात असताना त्याचा पाठलाग करून त्याला पकडण्यात आले. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने चोरीची कबुली देतानाच श्रमिकनगर मधील निर्मित लाईफ फेज येथे राहणाऱ्या कृष्णा दिलीप टाक या सोनारासह सोने विक्री केल्याची कबुली दिली आहे.

## अवघ्या दोन महिन्यांत उखडला रस्ता



**दै. अधिकारनामा**

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा नगर परिषदेमार्फत वडाळी-श्रीगोंदा यातील काही भागाचे नवीन रस्त्याचे काम करण्यात आले. रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने हा रस्ता अवघ्या दोन महिन्यांत उखडला आहे. हा रस्ता नागरिकांच्या फायद्यासाठी केला की, कंत्राटदाराच्या, असा सवाल उपस्थित केला जात आहे. श्रीगोंदा वडाळी या रस्त्यावरील आयटीआय कॉलेज ते विशाल हॉटेलपर्यंतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करण्यात आला. विशेष रस्ता अनुदानातून सुमारे ६२ लाख या रस्त्यासाठी मंजूर होते. पूर्वीच्या जुन्याच डांबरी रस्त्यावर कुठलेही रुंदीकरण न करता नवीन रस्ता बनविण्यात आला. मात्र, रस्ता अत्यंत निकृष्ट झाल्याचे समोर आले. तयार केलेला रस्ता अवघ्या दोन महिन्यांत जागोजागी उखडला आहे. आलेला निधी खर्च करण्यासाठी थातूरमातूर रस्ते तयार करून जनतेच्या पैशांची लूट केली जात आहे. या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे. आयटीआय कॉलेज ते वडाळी रस्ता नगराध्यक्षा शुभांगी पोटे यांच्या प्रभागात जातो आणि हाच रस्ता निकृष्ट दर्जाचा होत असेल, तर शहरातील इतर रस्ते व कामांचा दर्जा कसा असेल? सामाजिक कार्यकर्ते सतीश बोरुडे म्हणाले, केवळ ठेकेदार आणि संबंधित यंत्रणेच्या फायद्यासाठी निकृष्ट कामे केली जात आहेत. शासनाचा पैसा कामांवर खर्च न होता कोणाच्या खिशात जातो, हे शहरवासीयांनी शोधून काढायला हवे. मुख्याधिकारी मंगेश देवरे म्हणाले की, काम सुरू असताना वाहने गेल्याने रस्ता उखडला आहे. ज्या ठिकाणी रस्ता खराब झालाख तेथे नव्याने दुरुस्ती करून देण्याच्या सूचना ठेकेदाराला दिल्या आहेत.रस्ता दुरुस्त करून दिल्याशिवाय ठेकेदारास अंतिम बिल दिले जाणार नाही. सुमारे ६२ लाख रुपये खर्च करून केलेला रस्ता अवघ्या दोन महिन्यांत उखडत असेल, तर त्या कामाचा दर्जा निकृष्टच म्हणावा लागेल. या कामासाठी वापरण्यात आलेले डांबर दर्जेदार होते का, डांबरामध्ये काळे ऑईल समाविष्ट केले नव्हते ना, याची दक्षता व गुणनियंत्रण विभागाकडून तपासणी करण्याची मागणी होत आहे.

## माळेगावमध्ये बारामती-निरा मार्गाचे चौपदरीकरण होणार



**दै. अधिकारनामा**

**माळेगाव** : माळेगाव नगरपंचायतीच्या हद्दीतील निरा-बारामती राज्य मार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामासाठी तब्बल ८ कोटीपेक्षा जास्त निधी मंजूर झाल्याने रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामाला गती मिळाली आहे. रस्त्याचे काम करताना दर्जा राखला जावा, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे. गेले अनेक वर्षे या मार्गाच्या चौपदरीकरणाची नुसतीच चर्चा होत होती, आत मात्र कामाला सुरुवात झाली आहे. माळेगाव शनिमंदिर चौक ते इंजिनिअरिंग कॉलेज या दीड किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे चौपदरीकरण होणार आहे. रस्त्याचे काम दर्जेदार पद्धतीने होणे अपेक्षित आहे. रस्त्याच्या मधोमध दुभाजक व पथदिव्यांची व्यवस्था केली जाणार आहे. रस्त्याच्या दुतर्फा अडचणीची ठरणारी झाडे तोडण्याचे काम केले जात आहे. बारामती तालुक्यात नावारूपाला आलेल्या माळेगाव नगरपंचायतीच्या विस्तारीकरणात वाढ होत आहे. भविष्यातील रस्ते, दिवाबत्ती, गटारे आदी विकासकामांसाठी विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार हे निधी कमी पडू देणार नसल्याचा विश्वास राष्ट्रवादी युवानेते रविराज तावरे यांनी व्यक्त केला.

## पेरूचे दर वधारले ! उत्पादक शेतकर्यांना दिलासा



**दै. अधिकारनामा**

**बावडा** : मागील १५ दिवसांपासून पेरूच्या दरामध्ये मोठी वाढ झाल्याने पेरू शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. सध्या पेरूला बागेत जागेवर प्रति किलोस ६५ ते ७५ रुपये एवढा समाधानकारक दर मिळत आहे, अशी माहिती बावडा येथील पेरू उत्पादक शेतकरी व सहकारमहर्षी शंकरराव मोहिते पाटील कारखान्याचे संचालक महादेव घाडगे यांनी शुक्रवारी (दि. २) दिली. पेरूस १५ दिवसांपूर्वी प्रति किलोस फक्त ३० ते ४० रुपये एवढा दर होता. मात्र गणेशोत्सव, पुढे येणारा दुर्गोत्सव यामुळे पेरूला मागणी वाढली आहे. परिणामी सध्या पेरूस प्रतिकिलोस ६५ चे ७५ रुपये दर मिळत आहे. येथील महादेव घाडगे यांची २ एकर क्षेत्रावर पेरूची बाग असून, शुक्रवार (दि. २) पासून बागेतील पेरूची तोडणी चालू झाली आहे. त्यांचा एक पेरू सरासरी ३०० ते ३५० ग्रॅम वजनाचा असून शुक्रवारी हो पेरू बंगळूर बाजाराकडे रवाना झाला. घाडगे यांनी पेरूची तैवान पिंक या वाणाची रोपे हैदराबाद येथून गेल्या वर्षी आणली. त्यानंतर १२द्ब८ फूट अंतरावर लागवड केली. वेळोवेळी औषध फवारणी व तण व्यवस्थापन केले. बागेमध्ये पेरूचे फळ लागल्यानंतर त्यांनी फळावर फोम व त्यावरती प्लॅस्टिक पिशवी लावली आहे. त्यामुळे फळास उन्हापासून तडे गेले नाहीत व फळाची चकाकी कायम राहिली आहे. पेरूची तोडणी दिवाळीपर्यंत सुरू राहील असे महादेव घाडगे यांनी सांगितले. त्यांना बागेच्या व्यवस्थापनासाठी बंधू शंकरराव घाडगे, अंकुश घाडगे, रणजित घाडगे आदी कुटुंबीयांचे सहकार्य मिळत आहे. दरम्यान, इंदापूर तालुक्यात गेली पाच वर्षांपासून पेरू पिकाखालील क्षेत्र वाढत चालले असून, युवा शेतकरी वर्ग त्यामध्ये मोठ्या संख्येने दिसत आहे.